cmyk

## संपादकीय

### नेपाळमधील सत्ताधाऱ्यांचा अहंकार खाक !

भारताच्या शेजारच्या चार देशांत सत्ताधाऱ्यांविरोधात उग्र निदर्शनं झाली. श्रीलंका, बांगला देश आणि नेपाळमध्ये तर सत्ताधाऱ्यांना अक्षरशः पळ काढावा लागला. देश सोडून जावे लागले. लोकशाही व्यवस्थेशी केलेला खेळ, बेरोजगारीच्या प्रश्नाकडं केलेलं दुर्लक्ष, तरुणांच्या गरजांचा न केलेला विचार आणि सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार आदी कारणांमुळं संतप्त झालेल्या युवकांनी नंतर तात्कालिक कारणांचा आधार घेत देशात रक्तरंजीत बंड केलं.



# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### मालेगाव बॉम्बस्फोट हल्ल्यातील पीडित उच्च न्यायालयात

मुंबई : ाव बॉम्बस्फोट खटल्यात भाजपच्या माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्यासह कर्नल प्रसाद पुरोहित व अन्य पाच आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या विशेष सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. हल्ल्यातील पीडितांनी दाखल केलेल्या अपिलावर न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर १५ सप्टेंबरला सुनावणी होण्याची शक्यता आहे. या अपिलात दोषपूर्ण तपास किंवा तपासातील काही त्रुटी आरोपींना निर्दोष सोडण्याचे कारण असू शकत नाही, असा दावा करण्यात आला असून आरोपींच्या सुटकेचा निर्णय रद्द करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकेमुळे प्रज्ञासिंगसह अन्य आरोपींच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३६ | गुरूवार, दि.११ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



# राज्यात ८ महिन्यांत ११८३ शेतकरी आत्महत्या

मुंबई । प्रतिनिधी

**निसर्गाचा लहरीपणा यातून होणारी उत्पन्नातील घट; यामुळे शेतकरी हतबल होऊन जात असतो. यात कर्ज फेड होऊ शकत नसल्याने संकटात सापडलेला शेतकरी टोकाचे पाऊल उचलत असतो. यामुळे राज्यात शेतकरी आत्महत्येची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. यात मागील आठ महिन्यांत तब्बल एक हजार १८३ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपविल्याचे समोर आले आहे.**

राज्यात १४ जिल्हे शेतकरी आत्महत्या प्रवण आहेत. यामध्ये विदर्भातील सहा आणि मराठवाड्यातील आठही जिल्हे आहेत. या १४ जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्यांची नोंद घेतल्या जातात. त्यानुसार मागील आठ महिन्यांमध्ये अतिवृष्टीने शेतकऱ्याचे झालेले नुकसान, कर्जबाजारीपणा, योग्य हमीभाव आणि नैसर्गिक आपत्तीच्या विविध कारणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात सर्वाधिक प्रमाण हे पश्चिम विदर्भात आहे. शेतीसाठी कर्ज काढून शेतकरी पेरणी करून पिकांना खत पाणी देत असतो. मात्र अतिवृष्टी तसेच अवकाळी पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित असलेले उत्पन्न शेतातून मिळत नाही. यात बळीराजा आर्थिक संकटात सापडून टोकाचा निर्णय घेत असतो. यामुळे गेल्या काही काळात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण देखील वाढले आहे. यात मागील आठ महिन्यांचा विचार केल्यास राज्यातील शेतकरी आत्महत्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे.

> **“ मराठवाड्यात ५२० आत्महत्या**
>
> सर्वाधिक ४४ शेतकरी आत्महत्या ऑगस्ट महिन्यात यवतमाळ जिल्ह्यात झाल्या आहेत. तर ११८३ शेतकरी आत्महत्यामध्ये ६०७ शेतकरी आत्महत्या पात्र ठरविण्यात आल्या. तर ३०६ शेतकरी आत्महत्या अपात्र करण्यात आल्या. आठ महिन्यात छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये म्हणजे मराठवाड्यात ५२० शेतकरी आत्महत्याची नोंद आहे. पश्चिम विदर्भात ७०७ शेतकरी आत्महत्याची नोंद आहे.

# आता संपूर्ण देशभरात एसआयआर !

नवी दिल्ली । वृतसंस्था

निवडणूक आयोगातील सूत्रांच्या हवाल्यानुसार, ऑक्टोबरपर्यंत मतदार यादीची विशेष देशभरात पुनरावृत्ती सुरू होण्याची अपेक्षा आहे. बुधवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या (सीईओ) बैठकीत या प्रक्रियेच्या तयारीवर चर्चा करण्यात आली, जिथे या प्रस्तावाला हिरवा कंदील मिळाला.

निवडणूक आयोगाने अलीकडेच राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी बिहारमध्ये अशाच प्रकारची मतदार यादी पुनरावृत्ती केली. आता ही प्रक्रिया सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यापून टाकली जाईल. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) ची घोषणा



बिहार निवडणुका संपण्यापूर्वीच होऊ शकते. परिषद-सह-कार्यशाळेदरम्यान, सीईओंना विचारण्यात आले की ते पुनरावृत्तीसाठी किती लवकर तयार होतील. बहुतेक अधिकाऱ्यांनी आयोगाला आश्वासन दिले की सप्टेंबरपर्यंत मूलभूत कामे पूर्ण होतील, ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### लाडक्या बहिणींना ऑगस्ट महिन्याचा हप्ता लवकरच

मुंबईः मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा लाभार्थी महिलांना आहे. आतापर्यंत लाडक्या बहिणींना एकूण १३ हप्त्यांचे पैसे मिळाले आहेत. ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याच्या वितरणासंदर्भात नवी अपडेट समोर आली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय विभागानं ऑगस्ट महिन्याच्या आर्थिक लाभाच्या वितरणासाठी ३४४.३० कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाला वर्ग करण्यासंदर्भातील शासन निर्णय ९ सप्टेंबरला जारी करण्यात आला आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्याच्या लाभाचे वितरण करण्यासंदर्भातील एक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

### नेपाळमधील पर्यटकांना सुखरुप आणणार–पवार

पुणेः नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तिथं अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी राज्यसरकार युध्दपातळीवर प्रयत्न करत आहे. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसेच महाराष्ट्र सदन यांच्या माध्यमातून राज्य शासन नेपाळमधील भारतीय दुतावासाच्या संपर्कात असून राज्यातील पर्यटकांना आवश्यक ती मदत पुरविण्याचे प्रयत्न करत आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे हीच प्राथमिकता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटकांनी घाबरुन जाऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

### शिक्षण उपसंचालकसह उप शिक्षणाधिकाऱ्याला बेड्या

नाशिकः मालेगाव शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. नाशिकचे जिल्हा परिषद शिक्षण उपसंचालक प्रवीण पाटील, उपशिक्षण अधिकारी उदय देवरे, आणि कार्यालयीन अधीक्षक सुधीर पगार यांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या तिन्ही अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना १३ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी या आधी एका शिक्षण संस्थेच्या चालकासह तिघांना अटक करण्यात आली आहे. दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये हे अधिकारी आरोपी असल्याचे उघड झाले आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

### सुशीला कार्की होणार नेपाळच्या पंतप्रधान ?

दिल्लीः नेपाळच्या राजकारणात नवा टप्पा येताना दिसत आहे. हिंसाचार आणि सत्तासंकटाच्या पार्श्वभूमीवर आता देशाची धुरा कोण सांभाळणार, यावर चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आंदोलकांनी व्हर्च्युअल बैठक घेतली. या बैठकीत माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांचे नाव सर्वाधिक पुढे आले आहे. त्यामुळे सुशीला कार्की यांना नेपाळच्या अंतरिम पंतप्रधानपदाची जबाबदारी मिळू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. नेपाळच्या राजकारणात सध्या भूकंप आला आहे. आंदोलनाच्या दबावामुळे पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. यानंतर सत्ता कोणाच्या हाती जाणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### अनिल अंबानी यांच्यावर ईडीकडून नवीन गुन्हा दाखल

नवी दिल्लीः रिलायन्स ग्रुपचे चेअरमन अनिल अंबानी यांच्या अडचणीत वाढ होत आहे. अनिल अंबानी, रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि इतरांविरोधात २९२९ कोटी रुपयांच्या बँक फ्रॉड केसमध्ये ईडीनं मनी लाँड्रिंग प्रकरणात नवा गुन्हा दाखल केला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार ईडीकडून ही कारवाई गेल्या महिन्यात सीबीआयकडून दाखल करण्यात आलेल्या रिपोर्टवर आधारित आहे. सीबीआयनं स्टेट बँक ऑफ इंडियाला झालेल्या नुकसानासाठी अनिल अंबानी, रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि इतरांना जबाबदार ठरवलं आहे. या प्रकरणी सीबीआयनं अनिल अंबानी यांच्याशी संबंधित ठिकाणांवर छापेमारी केली होती.

# ओबीसी उपसमितीने तेढ निर्माण करू नये–जरांगे पाटील

जालना । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जर मोठ्या मनाने ओबीसींसाठी उपसमिती गठीत केली असेल. तर त्या उपसमितीने आणि उपसमितीच्या सदस्यांनी, जातीजातीमध्ये भांडण लावण्यापेक्षा त्या उपसमितीचा फायदा गोरगरीब ओबीसीच्या योजना राबवण्यासाठी केला पाहिजे, असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. ओबीसीची उपसमिती झाली म्हणजे मराठ्याच्या विरोधात गरळ ओकायला नको किंवा मंत्रिमंडळाच्या बैठका घेऊन खोटे निर्णय घेणे हे व्हायला नको, असेही त्यांनी स्पष्ट केले.



अंतरवाली सराटीत पत्रकारांशी संवाद साधताना मनोज जरांगे पुढे म्हणाले की, माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती आहे की, ओबीसी उपसमिती ही लोकांना जातीवाद वाटू नये. तसेच मराठा उपसमितीमध्ये आणि ओबीसी उपसमितीमध्ये जातीवाद वाटू नये. त्यासाठी मराठा उपसमिती आणि ओबीसी उपसमिती या दोन्हीमध्ये मराठा आणि ओबीसी समाजाचे मंत्री असावेत. ओबीसींच्या उपसमितीमध्ये फक्त ओबीसी आणि मराठा उपसमितीमध्ये फक्त मराठा असा दुजाभाव नसावा. यावर सुद्धा बारकाईने लक्ष मुख्यमंत्र्यांनी ठेवले पाहिजे. अंतरवाली ▶▶ पान २ वर

# कागदपत्रांचा घोळ; दीड लाख शिक्षकांचा पगार थकला ?

पुणे–बीड । प्रतिनिधी

**राज्यातील दीड लाख शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा–यांचा पगार थांबणार आहे. आणि त्याला कारण ठरलंय. शालार्थ आयडीतील बोगसगिरी विरोधात शिक्षण विभागाने सुरु केलेली शोध मोहीम.याच मोहिमेमुळे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा–यांचे टेन्शन वाढले आहे. कारण मुदतीत कागदपत्रे अपलोड न करणा–या राज्यभरातील शिक्षकांचे पुढील महिन्याचा पगार थांबवण्याचे आदेश वेतन अधीक्षकांनी काढलेत.राज्यातील बीड जालना नागपूर अमरावती नाशिक आदी जिल्ह्यात अनेक बोगस भरती झाल्याने याची एसआयटी मार्फत चौकशी सुरु आहे.**



राज्यभरातील खासगी, अनुदानित आणि सरकारी शाळांमध्ये साडेचार लाख शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत. यात नोव्हेंबर २०१२ ते ऑगस्ट २०२५ दरम्यान मात्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत मान्यता मिळालेल्या कर्मचा–यांना ऑनलाईन कागदपत्रं अपलोड करण्याचे आदेश दिले होते. यात वैयक्तिक मान्यता, रुजू अहवाल, नियुक्ती आदेश यासोबतच शालार्थ आयडीची माहितीचा समावेश होता.मात्र अनेक शिक्षकांनी माहिती अपलोड न केल्याने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. मात्र ▶▶ पान २ वर



## परळीजवळ अपघात दोघे जागीच ठार

परळी वै. । प्रतिनिधी

परळी– बीड रस्त्यावरील पांगरी गावाजवळ टिप्परने एका बुलेटला जोराची धडक देऊन उडवल्याने घडलेल्या भीषण अपघातात दोन जण जागीच ठार झाले आहेत. तर एक महिला ▶▶ पान २ वर

# स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी आता २४ सप्टेंबरला होणार

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. या बहुचर्चित प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे. या हत्याकांड प्रकरणी बुधवारी (१० सप्टेंबर) बीड जिल्हा कोर्टात सुनावणी झाली. आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, महेश केदार आणि प्रतीक घुले यांच्या दोषमुक्तीच्या अर्जावर युक्तिवाद करण्यात आला. आता या प्रकरणी पुढील सुनावणी २४ सप्टेंबरला होणार आहे.**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी बुधवारी झालेल्या सुनावणीत सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, प्रतीक घुले,जयराम चाटे यांच्या दोषमुक्ती अर्जावर युक्तिवाद झाला. आरोपींचे वकील दिग्विजय पाटील यांनी जवळपास अर्धा तास युक्तिवाद केला. मात्र, एकत्र दोषारोपपत्र दाखल करणे ▶▶ पान २ वर

# आमच्या संविधानाचा आम्हाला अभिमान

## नेपाळच्या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीश यांचे वक्तव्य

दिल्ली । वृतसंस्था

भारतीय संविधानाची ताकद अधोरेखित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दोन दिवसांपासून सुरू असलेल्या नेपाळ हिंसाचाराचा संदर्भ दिला. भारताचे सरन्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने राष्ट्रपती संदर्भ प्रकरणाची सुनावणी सुरू असताना नेपाळमधील तणावपूर्ण परिस्थितीचा उल्लेख केला.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले की, ‘‘आम्हाला आमच्या संविधानाचा अभिमान आहे, शेजारील देशांमध्ये काय चालले आहे ते पहा,’’ असे सांगत भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचा संदर्भ देत म्हटले, ज्यामध्ये आतापर्यंत २२ लोक मारले गेले आहेत. ‘‘आणि बांगलादेश,’’ असे न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी शेजारील देशात विद्यार्थ्यांच्या निदर्शनाचा संदर्भ देत म्हटले, ज्यामुळे तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना देश सोडून ▶▶ पान २ वर

# डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन रद्द तर सुरेश साबळे यांची माजलगावला बदली

मुंबई–बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयाचे तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक अशोक थोरात यांना कोविड काळातील गैरव्यवहार प्रकरणी निलंबित करण्यात आले होते तर त्याच दरम्यान दुसरे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांच्यावरही कारवाई करण्यात आली होती. मात्र आता डॉ.थोरात यांचे निलंबन रद्द करण्यात आले असून, त्यासोबतच डॉ.सुरेश साबळे यांची माजलगाव ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय



अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने आरोग्य विभागातील काही वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ▶▶ पान २ वर

# माकड उड्याकडे लक्ष देऊ नका

## आ.विजयसिंह पंडित यांची नाव न घेता लक्ष्मण हाके यांच्यावर टीका

बीड । प्रतिनिधी

‘गोरगरीब गरजवंत मराठा तरुणांना आता हे सांगणे आहे की, समाज बांधवांनी केलेल्या मागण्या शासनाने मान्य करून या बाबत प्रत्यक्ष कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे आता या बाकीच्या दंड थोपटण्याच्या भानगडीत अजिबात पडू नका. ज्याला कोणाला माकड उड्या मारायच्या त्या निवांत मारू दया, दुर्लक्ष करा. या माकड उड्या आरक्षण बचावासाठी नसून राजकारणासाठी आहेत. संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचा संघर्ष आणि त्यांना समाजाने



दिलेल्या पाठबळ यांमुळे हे आरक्षण मिळाले आहे, जे शक्य नव्हते ते शक्य झाले आहे. भविष्यात काय होईल या पेक्षा आज जे हातात आले आहे त्याचा फायदा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.५० क्विंटल | २,४०० | २,९२२ | २,६४८ |
| ज्वारी/हायब्रिड:११६.५० क्विंटल | १,९०० | ३,३०१ | २,५२२ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : २२.५० क्विंटल | ६,१०० | ६,५०० | ६,३०० |
| उडीद : ३३.०० क्विंटल | ३,४०१ | ५,७३६ | ४,७९४ |
| बाजरी:६१.०० क्विंटल | २,१०० | २,९४८ | २,५७० |
| मुग:३१.०० क्विंटल | ४,९०० | ८,०५० | ५,९५० |
| सोयाबीन: ३५.५० क्विंटल | ४,३५० | ४,३५० | ४,३५० |
| हरभरा: ४.५० क्विंटल | ४,२०० | ५,५०० | ५,०३३ |

# उपराष्ट्रपती निवडणुकीत भाजपच्या १२ खासदारांचे क्रॉस व्होटींग ?

नवी दिल्ली । वृतसंस्था

**उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत ज्या पक्षांचे क्रॉस व्होटिंग झाले आहे, त्या पक्षांनी त्याचा शोध घेऊन कारवाई करावी असे आम आदमी पक्षाचे राज्यसभेचे सदस्य संजय सिंह यांनी म्हटले आहे. तसेच याच पक्षाचे आणखी एक नेते अनुराग धांडा यांनी एक मोठा दावा करताना या निवडणुकीत २७ विरोधी खासदारांनी सरकारच्या उमेदवाराच्या बाजूने क्रॉस व्होटिंग केले असल्याचे म्हटले आहे.**

अनुराग धांडा यांनी असाही दावा केला की, १२ भाजप खासदारांनीही विरोधी उमेदवाराच्या बाजूने क्रॉस



व्होटिंग केले आहे. वास्तविक वेगवेगळ्या बातम्यांमध्ये असा दावा केला जात आहे की, उपराष्ट्रपती निवडणुकीत आम आदमी पक्षाच्या खासदारांनी क्रॉस व्होटिंग केले. मात्र धांडा यांनी हे दावे पूर्णपणे फेटाळून लावले. आम आदमी पक्षाचे लोकसभेत तीन खासदार आहेत. होशियारपूरमधून राजकुमार छब्बेवाल, संगरूरमधून गुरमीत सिंग मीत हेयर आणि आनंदपूर साहिबमधून मालविंदर सिंग कांग हे खासदार आहेत. आपचे राज्यसभेत एकूण नऊ खासदार आहेत. नारायण दास गुप्ता, स्वाती मालीवाल आणि संजय सिंह दिल्लीतून राज्यसभेत गेले आहेत. पंजाबमधून राघव चड्ढा, अशोक कुमार मित्तल, संदीप पाठक, विक्रमजीत साहनी, हरभजन सिंग आणि संत बलबीर सिंग हे राज्यसभेवर गेले आहेत.

# राज-उद्धव यांची पुन्हा भेट !

## मनसे पदाधिकाऱ्यांची आज तातडीची बैठक

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी (दि. १०) राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या भेटीचे अनेक राजकीय अर्थ काढले जात आहेत. आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे. त्यातच उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांना शिवसेनेच्या दसऱ्या मेळाव्याला हजेरी लावण्यासाठी निमंत्रण दिले आहे. यामुळे शिवसेना आणि मनसे एकत्र



येण्याच्या चर्चांना ऊत आला आहे. या सर्व घडामोडी सुरू असतानाच राज ठाकरे यांनी मोठा निर्णय घेतला असून, त्यांनी गुरूवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तातडीची बैठक बोलावली आहे.

बुधवारी अचानक उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या निवासस्थानी ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# नेपाळमधील सत्ताधाऱ्यांचा अहंकार खाक !

भारताच्या शेजारच्या चार देशांत सत्ताधाऱ्यांविरोधात उग्र निदर्शनं झाली. श्रीलंका, बांगला देश आणि नेपाळमध्ये तर सत्ताधाऱ्यांना अक्षरशः पळ काढावा लागला. देश सोडून जावे लागले. लोकशाही व्यवस्थेशी केलेला खेळ, बेरोजगारीच्या प्रश्नाकडं केलेलं दुर्लक्ष, तरुणांच्या गरजांचा न केलेला विचार आणि सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार आदी कारणांमुळं संतप्त झालेल्या युवकांनी नंतर तात्कालिक कारणांचा आधार घेत देशात रक्तरंजीत बंड केलं. भारतानं या शेजारच्या देशांतील घडामोडींपासून बोध घेतला पाहिजे.

नेपाळमध्ये तरुण आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आक्रमकपणे दडपण्याचा प्रयत्न पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना महागात पडला आणि अखेर त्यांना खुर्ची सोडावी लागली. काठमांडूच्या रस्त्यांवरील निदर्शनं सुरुवातीला शांततेत होती; परंतु निदर्शक काही क्षणातच गोंधळले. याचं एक प्रमुख कारण म्हणजे सरकारनं निदर्शकांवर प्राणघातक बळाचा वापर केला. अश्रुधुराच्या नळकांड्या, रबर गोळ्यांनंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी गोळीबार केला. त्यांना असं करण्यापासून सत्ताधाऱ्यांनी परावृत्त केलं नाही. पंतप्रधान ओली यांनी हिंसाचारासाठी घुसखोरांना जबाबदार धरलं आणि चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले. निदर्शनं सुरू झाल्यानंतर ओली यांनी प्रथम 'सोशल मीडिया'वरील बंदी उठवण्यास नकार दिला. त्यांनी ताठर भूमिका घेतली. दुष्कर्म्यांसमोर झुकण्यास तयार नाही, असं त्यांनी सांगितलं;परंतु नंतर त्यांना बंदी उठवण्याचा निर्णय घ्यावा लागला. 'सोशल मीडिया'च्या ६२ साईटस्‌वर घातलेली बंदी, चीनच्या काही साईटस् मात्र चालू, नोंदणीसाठी ताठर भूमिका, विद्यार्थी आणि तरुणांच्या 'सोशल मीडिया' वरचं अवलंबित्व, त्या माध्यमातून त्यांना मिळणारा रोजगार, सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार, त्यांच्या कुटुंबीयांचं राजेशाही राहणं, बेरोजगारी या सर्वांचा उद्रेक नेपाळमध्ये झाला. युवकांच्या मनात किती पराकोटीचा असंतोष भरलेला होता, हे त्यांच्या लक्षातच आलं नाही.

नेपाळ काही काळापासून तीव्र निराशेनं ग्रस्त आहे. या वर्षी मार्चमध्ये देशभरात राजेशाही समर्थक निदर्शनांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला. या निदर्शनांनी राजेशाहीच्या पुनरागमनाला वाढता पाठिंबा अधोरेखित केला; परंतु लोक राजकीय व्यवस्थेबद्दल आणि वाढत्या बेरोजगारीबद्दलही संतापले होते. अशा परिस्थितीत, जेव्हा सरकारनं चार सप्टेंबर रोजी २६ 'सोशल मीडिया प्लॅटफॉर्म'वर बंदी घातली, तेव्हा संताप आणखी भडकला. सध्याच्या 'जनरेशन-झेड' निदर्शनाची तुलना नेपाळमधील पूर्वीच्या राजेशाही शासकांविरुद्ध २००६ मध्ये झालेल्या क्रांतीशी केली जात आहे. सुरुवातीला ओली यांनी दाखवलेल्या आक्रमक वृत्तीमुळं त्यांच्या स्वतःच्या सरकारच्या सहयोगींनी त्यांच्यापासून स्वतःला दूर केलं. गृहमंत्री रमेश लेखक यांनी नैतिक आधारावर राजीनामा दिला, तर कृषिमंत्र्यांनीही मंगळवारी सरकारच्या हुकूमशाही कृतींच्या निषेधार्थ राजीनामा दिला. नेपाळी काँग्रेसनं युतीच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि ओली यांना पंतप्रधानपदावरून पायउतार होण्यास सांगितलं. माजी पंतप्रधान प्रचंड यांच्यासारख्या विरोधी नेत्यांनीही सरकारला लोकांच्या चिंताकडं लक्ष देण्याचा सल्ला दिला. नेपाळमधील राजकीय अस्थिरता, भ्रष्टाचार आणि बेरोजगारीच्या त्रिकोणामुळं देशातील तरुणांना नैराश्य आणि संताप आला आहे. गेल्या १७ वर्षांत तिथं १४ सरकारं बदलली आहेत. म्हणजेच जवळजवळ दरवर्षी एक नवीन पंतप्रधान. एवढंच नाही, तर तरुण पिढीमध्ये भ्रष्टाचाराबद्दल संतापही वाढत राहिला. पायउतार होणारे पंतप्रधान केपी शर्मा ओली, माजी पंतप्रधान शेर बहादूर देउबा, पुष्प कमल दहल प्रचंड, बाबुराम भट्टराय या सर्वांवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन) मते, २०२५ मध्ये नेपाळचे नाममात्र दरडोई उत्पन्न १४०४ डॉलर (सुमारे १.२३ लाख रुपये) आहे. नोकऱ्या आणि संधींचा प्रचंड अभाव आहे. नेपाळमधील लोकांना रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात देशाबाहेर स्थलांतर करण्यास भाग पाडलं जात आहे. सध्याच्या निषेधांवरून असं दिसून येतं, की राजकीय उच्चभ्रू कुटुंबांच्या आणि सामान्य लोकांच्या जीवनशैलीतील फरक तरुणांमध्ये संताप निर्माण करत आहे. 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत असलेला नेपोबेबी हा हॅशटॅग याचाच संकेत आहे. केवळ 'सोशल मीडिया'वर बंदी घालण्यानं 'जनरेशन-जी' आंदोलनकर्त्यांना बळकटी दिली नाही. (पुर्वार्ध...)

# महामार्गावरील व्हायरल व्हिडीओमधील टोळी अखेर गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची धाडसी कारवाई

**धाराशिव। प्रतिनिधी**

**सोलापूर-छत्रपती संभाजी नगर महामार्गावर तेरखेड्याजवळ भर दिवसा चालत्या ट्रकमधून चोरी करणाऱ्या चोरट्यांचा एक व्हिडिओ काही दिवसांपूर्वी समाज माध्यमांवर (सोशल मीडियावर) प्रचंड व्हायरल झाला होता. या व्हिडिओमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली होती आणि महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. अखेर, याच व्हिडिओमधील सहा जणांच्या टोळीला बेड्या ठोकण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे.**


व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये काही चोरटे अत्यंत धाडसीपणे चालत्या ट्रकवर चढून त्यातील माल चोरताना स्पष्ट दिसत होते. भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे वाहनचालक आणि प्रवाशांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस प्रशासनाने तपासाला वेग दिला होता. स्थानिक गुन्हे शाखेने या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी एक विशेष पथक तयार केले होते. या पथकाने गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे या सहा जणांच्या टोळीचा माग काढला आणि सापळा रचून त्यांच्या मुसक्या आवळल्या. हीच टोळी मागील काही काळापासून बीड ते धाराशिव दरम्यान महामार्गावर पहाटेच्या वेळी आणि आता दिवसाढवळ्याही चोऱ्या करत असल्याचे तपासात समोर आले आहे. या धाडसी कारवाईबद्दल स्थानिक गुन्हे शाखेचे कौतुक होत आहे. या टोळीच्या अटकेमुळे महामार्गावरील अनेक लहान-मोठे चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. या कारवाईमुळे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी आणि विशेषतः ट्रकचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाला उपस्थित रहा-आंबेकर,घरत

**बीड । प्रतिनिधी**

**अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष दत्ता आंबेकर , जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत यांनी केले आहे.**





छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे ,कोषाध्यक्ष शेख मन्सूर भाई ,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत यांनी केले आहे.

## स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या दोन खेळाडूंची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

पाटोदा । प्रतिनिधी

श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ संचलित,स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगाव ता.पाटोदा,जिल्हा बीड येथील तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत कुमार.शिवम सुरेंद्र भवर ५२ किलो वजन गटात प्रथम आणि कुमार.वैभव बडू गाडे ६५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला. या तालुकास्तरीय स्पर्धा जय हनुमान व्यायाम शाळा चुंबळी ता.पाटोदा येथे ८ ते ९ सप्टेंबर रोजी पार पडल्या.बीड येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेत करणार पाटोदा तालुक्याचे प्रतिनिधित्व.या निमित्ताने शाळेत या गुणवंत विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.या विजेत्या खेळाडूंना आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाचे माजी आमदार श्री.साहेबरावजी दरेकर नाना,संस्थेचे अध्यक्ष बीड जिल्हा परिषदचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती,विद्यमान जि.प.सदस्य श्री.उध्दव बाप्पु दरेकर, माजी जि.प.सदस्य राजाभाऊ(काका)दरेकर ,युवानेते सागर दादा दरेकर,युवानेते ऋषिकेश भैय्या दरेकर,युवानेते यश भैय्या दरेकर, सर्व आजी-माजी सरपंच,उपसरपंच,ग्रा. प.सदस्य,सेवा सोसायटीचे चेअरमन,सदस्य मुगगाव,अंतापुर,जोगदंडवाडी,गाडे वस्ती,इंचरनातलाव,समस्त मान्यवर ग्रामस्थ,पालक तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री.अनिल येरकळ,सहशिक्षक श्री.अशोक साळुंके,श्री.बापूराव पोकळे,श्री.मुकुंद लगड,श्री.संजय शेळके,श्री.नवनाथ लाड,श्री.आदिनाथ पडोळे,श्री.राजू कटके,श्री.अमोल लगड,श्री.दत्तात्रय आवारे,लिपिक श्री.सोमनाथ दरेकर,शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.संजय खोटे,श्री.आप्पासाहेब पवार,श्री.भाऊसाहेब दत्तात्रय भवर व शाळेचे सर्व विद्यार्थी,विद्यार्थिनी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पुढील पाच दिवस पावसाचे; विदर्भ, मराठवाडा मुसळधार पावसाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या महिन्याभरात राज्यात जोरदार पाऊस कोसळल्यानंतर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर काहीसा कमी झाला होता. मात्र, आता पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावणार असून, विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील तीन ते चार दिवसांत राज्यभर पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले असून, हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी विविध जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मराठवाड्यातील बहुतांश भागात पावसाचाजोर कायम राहणार आहे. अरबी समुद्राच्या ईशान्य भागात कमी दाबाचा पट्टा सक्रिय असून, तो हळूहळू पश्चिमेकडे सरकत आहे. तसेच, बंगालच्या उपसागरातही पावसासाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. यामुळे मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल, असा अंदाज आहे. वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ६० किमी राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. यामध्ये खालील जिल्ह्यांचा समावेश आहे:

### मराठवाड्यात जोर वाढणार...

पुढील पाचही दिवस राज्यात विविध ठिकाणी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. विशेषत: मराठवाड्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, तर उर्वरित भागात ढगाळ वातावरण राहील. नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

### चार दिवसांत याठिकाणी पावसाचा अंदाज

११ सप्टेंबर - सांगली, सातारा, सोलापूर, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली., १२ सप्टेंबर - पुणे, नगर, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली आणि संपूर्ण विदर्भ., १३ सप्टेंबर - मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नगर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली आणि संपूर्ण विदर्भ., १४ सप्टेंबर - मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, वाशिम.

## पान ६ वरून...

### ना.भुजबळ यांच्या

आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे असा हट्ट करत मागच्या दोन वर्षांपासून ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले आहे. मंडल आयोगाची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यात यावी, जातनिहाय जनगणना करण्यात यावी, हैदराबाद गॅझेटीयर तात्काळ रद्द करावे आदी मागण्यासाठी देशाचे ओबीसी नेते छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षणाच्या संघर्षाचा लढा अधिक तीव्र करणार असल्याचे ॲड. सुभाष राऊत यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिरूर कासार तालुक्यातील ओबीसी समाज बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

----------

### इंडिया बँकेच्या मॅनेजरची

त्यामुळे भालेराव आज दिनांक १० रोजी पुन्हा बँकेत गेले.आधी काऊंटरवर चौकशी केली आणि आरटीजीएस पास झाले नाही म्हणून त्यांनी इंडिया बँकेचे मॅनेजर यांच्या कॅबिनमध्ये जावून त्यांना या विषयी अतिशय नम्रपणे विचारणा केली. त्यावर तुम्ही डायरेक्ट माझ्याकडे कसे आलात, तुम्ही पंतप्रधानांकडे जाणार आहात का? असे सांगून अरेरावी भाषा वापरली. मॅनेजर हे बँकेचे प्रमुख असतात. अडचण आल्यास ग्राहक त्यांच्याकडे जाणारच मात्र इंडिया बँकेच्या मॅनेजरला ग्राहकांशी बोलण्याची ॲलर्जी असल्याचे दिसून आले. इंडिया बँकेत तक्रार देत असताना खातेदारांनी तरी तक्रार स्वीकारली नसल्याने अनिल भीमराव भालेराव यांनी ऑनलाईन तक्रार केली आहे.वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन मुजोर मॅनेजरला तंबी द्यावी अशी मागणी खातेदाराकडून होत आहे.

----------

### बीड पोलीस दलाच्या

प्रशासनाच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे. बीड जिल्हा पोलीस दल राज्यातील डिजिटल कामकाजाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकत असून बीड जिल्हा पोलीस दल हा सर्व स्तरावर पोलीस स्टेशन, शाखा व इतर सर्व कार्यालयामध्ये असा उपक्रम हाती घेणारा छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रात पहिलाच जिल्हा ठरला असुन महाराष्ट्रात अग्रगण्य येण्याचा मानस आहे. यामुळे पोलीस प्रशासनात आधुनिकतेचा व पारदर्शकतेचा नवा अध्याय सुरु होणार आहे.बीड जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनाखाली तसेच मा.अपर पोलीस अधीक्षक श सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा पोलीस दलामध्ये ई ऑफिस संगणक प्रणाली कार्यान्वीत करण्याचे कामकाज आयटी सेलचे पो.अं. विलास चव्हाण, पो.उपनि, संदीप जाधव व इतर स्टाप यांनी केले आहे. तसेच कार्यालयीन अधीक्षक नरसिंग कासेवाड यांचे ही सहकार्य मिळाले आहे.

----------

### संपादक राजेंद्र होळकर

त्यांनी आयुष्य जगले. मागच्या काही काळात त्या आजारी असतानाही त्यांनी जिद्द सोडली नव्हती. अभिमानच्या वाटचालीत संपादक राजेंद्र होळकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका त्या कायम घेत आल्या होत्या. बुधवारी त्यांची प्राणज्योत मालवली. बुधवारी दुपारी पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी होळकर कुटूंबासोबतच अभिमान परिवारावर प्रेम करणार्या अनेकांची उपस्थिती होती.सुहासिनी होळकर यांच्या निधनाचे वृत्त कळताच जिल्हाभरातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राजेंद्र होळकर यांचे फोनवर सांत्वन केले. सुहासिनी होळकर यांच्या पश्चात पती राजेंद्र होळकर, मुलगा डॉ.साहिल असा परिवार आहे.

----------

# वाहनाच्या हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी वाहनधारकांची लुट

**बीड । प्रतिनिधी**

**शासनाच्या मोटार वाहन कायदा १९८९ च्या नियम ५० नुसार सरकारने हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठीची योजना सुरू केली आहे. सुरुवातीला मार्च २०२५ अखेर नंबर प्लेट बसून एक बंधनकारक होते मात्र शासनाने वेळोवेळी यामध्ये मुदतवाढ दिली आहे. तथापि सदर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सी कडून वाहनधारकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट सुरू झाली आहे.**




शासनाने दुचाकी वाहनासाठी ४५० तीन चाकी वाहनासाठी ५०० आणि चार चाकी वाहनासाठी ७५० रुपये हाय सिक्युरिटी नंबर साठी दर जाहीर केले आहे. यासाठी ऑनलाईन वेबसाईट देण्यात आली असून यावर व वाहनधारकांना नोंदणी करता येते. सदर सदर नोंदणी केल्यानंतर विहित कालावधीत नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीकडे नंबर प्लेट मिळते. सदर नंबर प्लेट बसविण्यासाठी वाहनधारक गेल्यानंतर दुचाकी साठी या प्लास्टिक ब्रॅकेटची बाजारात किंमत १०० रुपये आहे तर चार चाकी वाहनाच्या ब्रॅकेट साठी ची किंमत २५० असताना सदर ब्रॅकेट साठी दुप्पटीने पैशाची वसुली केली जाते. यामुळे ग्राहकांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. चारचाकी वाहनासाठीचे ब्रॅकेट बाजारात २५० रुपयाला आहे. मात्र संबंधित एजन्सी कडून रुपये ५०० घेतले जातात. बीड येथे यफटी एसएफआरटी सोलुशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याचे कंत्राट देण्यात आलेले आहे. जर एजन्सी कडून नंबर प्लेट बसवण्यासाठीच्या प्लास्टिक ब्रॅकेट नंबर प्लेट बसवण्यासाठी लूट केली जात आहे. या लुटीसंदर्भात शासनाच्या राज्य परिवहन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती चौकशी करून कारवाई करावी,अशी मागणी करण्यात आली आहे.

## पान १ वरून...

### आता संपूर्ण देशभरात

ज्यामुळे ऑक्टोबरच्या सुरुवातीचा मार्ग मोकळा झाला. दिवसभर चाललेल्या या बैठकीत साडेतीन तासांहून अधिक काळ सादरीकरणे समाविष्ट होती, ज्यामध्ये एसआयआरच्या लॉजिस्टिक्स आणि तयारीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. सूत्रांनी सांगितले की, निवडणूक आयोगाने राज्य सीईओंना पुनरावृत्ती दरम्यान मतदारांची पडताळणी करण्यासाठी वापरता येतील अशा कागदपत्रांची यादी तयार करण्याचे निर्देश दिले. हे स्थानिक पातळीवर स्वीकारले जाणारे आणि सहज उपलब्ध असलेल्या प्रमाणपत्रांवर आधारित असतील, जे प्रदेशानुसार बदलतात. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की विशेष सघन पुनरावृत्तीचे मुख्य उद्दिष्ट मृतांची नावे, कायमचे स्थलांतरित झालेले लोक, डुप्लिकेट नोंदी किंवा नागरिक नसलेल्यांची नावे वगळून मतदार यादी साफ करणे आहे, तसेच प्रत्येक पात्र मतदाराचा समावेश आहे याची खात्री करणे आहे. मतदार यादीची अखंडता आणि अचूकता राखण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन करून निवडणूक आयोगाने सातत्याने एसआयआरचा बचाव केला आहे. ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण भारतात ही प्रक्रिया सुरू होण्याची अपेक्षा आहे.

----------

### कागदपत्रांचा घोळ; दीड

मुदत वाढवूनही शिक्षकांनी ऑनलाईन कागदपत्रं अपलोड केले नाहीत. त्यामुळे त्यांचे पगार थांबवण्याचे आदेश शिक्षण अधीक्षकांनी मुख्याध्यापकांना दिलेत. मात्र यात शाळा आणि संस्था बदलल्याने संबंधित संस्थेकडून कागदपत्रं मिळत नसल्याची शिक्षकांची तक्रार आहे.. एकीकडे सुप्रीम कोर्टाने २००० नंतर जॉईन झालेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण करावी अन्यथा निवृत्तीचा पर्याय दिला आहे. तर दुसरीकडे मुदतीत कागदपत्रं अपलोड न केल्याने शिक्षकांचे पगार थांबणार आहेत.बीड नागपूर नाशिक या जिल्ह्यातील संख्या अधिक असल्याची माहिती असून बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई माजलगाव या तालुक्यातील शाळांच्या तपासणीसाठी नुकतेच एक पथक स्थापन करण्यात आले आहे.

----------

### ओबीसी उपसमितीने तेढ

सराटीत जरांगेंनी पुन्हा एकदा भुजबळांवर बोचरी टीका केली. 'छगन भुजबळ यांच्यावर जास्त लक्ष ठेवले पाहिजे. मराठा आणि ओबीसी आता कुठेतरी एक होतोय. देवेंद्र फडणवीस यांना छगन भुजबळांमुळे डाग लागू नये याची काळजी घेतली पाहिजे. छगन भुजबळ यांना नाव आणि प्रसिद्धीची खूप मस्ती आहे. ते सरकारसाठी मोठी डोकेदुखी बनले आहेत', अशा शब्दात त्यांनी भुजबळांचा समाचार घेतला. मराठवाड्यातील मराठा समाज शंभर टक्के कुणबी असून हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारे त्यांना तातडीने प्रमाणपत्रे द्यावीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या अभियानाप्रमाणे ही प्रक्रिया राबवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

----------

### आमच्या संविधानाचा

पळून जावे लागले. दोन्ही शेजारील देशांमध्ये हिंसक निदर्शने झाली, तरुणांनी आपापल्या पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी करत रस्त्यावर उतरल्याने इमारती जाळल्या गेल्या. सोमवारी नेपाळच्या रस्त्यांवर जनरेशन झेडच्या निदर्शकांनी पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि त्यांच्या सरकारच्या राजीनाम्याची मागणी करत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि सोशल मीडिया बंदीविरोधात निदर्शने केली तेव्हा भयानक दृश्ये दिसून आली. निदर्शकांनी सुरक्षा दलांशी संघर्ष केल्याने निदर्शनांना हिंसक वळण लागले. नेपाळमध्ये झालेल्या हिंसाचारात आतापर्यंत २२ जणांचा मृत्यू झाला आहे. मंगळवारी संतप्त निदर्शकांनी देशाचे संसद भवन, राष्ट्रपती कार्यालय, पंतप्रधानांचे निवासस्थान, राजकीय पक्ष कार्यालये आणि वरिष्ठ नेत्यांची घरे जाळून टाकली.

------------

### स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणाची

याला कोर्टाची परवानगी घेतली नाही. सुधीर सांगळे याची पूर्वीची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. ६ डिसेंबरच्या घटनेचा १३ डिसेंबर रोजी ॲट्रॉसिटी दाखल केली. पाचही आरोपीवरील प्रलंबित ११ केसेस या वैयक्तिक स्वरूपाच्या आहेत. सुदर्शन घुले इतर आरोपीच्या प्रॉपर्टी संदर्भात कुठलाही अर्ज नाही. तसेच सुदर्शन घुले यांच्यावर कर्ज असल्याचेही आरोपीच्या वकिलांनी कोर्टात सांगितले.खंडणी प्रकरणात २९ तारखेची रेकॉर्डिंग नाही, रकमेचा उल्लेख नाही आणि पैसे दिले घेतल्याचाही पुरावा नाही. तर ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यात आरोपीची ओळख परेड नाही तसेच परेड पंचनामाही नाही. पाचही आरोपींची वरच्या कोर्टात जाण्याची परिस्थिती नाही, त्यामुळे त्यांना इथेच न्याय द्यावा, अशी विनंती वकील दिग्विजय पाटील यांनी कोर्टाकडे केली. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी आरोपींच्या वकीलांच्या युक्तिवादाला जोरदार विरोध केला.

--------------

### परळीजवळ अपघात

गंभीर जखमी झाली आहे. हा अपघात आज सायंकाळी ६:३० च्या सुमारास घडला आहे. हा अपघात एवढा भीषण होता की रक्ताच्या थारोळ्यात या गाडीवरील मोटर सायकल स्वार पडले आहेत. मयत इसम परळी तालुक्यातील जळगाव येथील सरपंच वसंत ताराचंद चव्हाण असुन या अपघातात एका चिमुकलीचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. आपघातस्थळी मोठी गर्दी जमा झाली होती. उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.

---------

### माकड उड्याकडे लक्ष

घ्या,'' असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी केले आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी मुंबईला जाण्याचे ठरवल्यानंतर बीड जिल्ह्यातील गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी जाहीर पाठिंबा दिला होता. विजयसिंह पंडित यांनी चलो मुंबईचा नारा दिल्यानंतर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी शेलक्या शब्दांत आमदार पंडित यांच्यावर निशाणा साधला आणि त्यानंतर दोघांमध्ये चांगलाच वाद रंगला होता. हाके यांच्यावर गेवराईत हल्ल्याचाही प्रयत्न झाला. मात्र मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला यश येऊन सरकारने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटचा जीआर काढल्यानंतर आता पात्र व्यक्तींना कुणबी दाखले देण्यास सुरुवात झाली असून विजयसिंह पंडित यांनी पुन्हा एकदा लक्ष्मण हाके यांना डिवचलं आहे. तसंच मराठा समाजातील तरुणांना महत्त्वाचं आवाहनही केलं आहे. तरुणांना आवाहन करताना विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, ''पुढील काळात चांगले दर्जेदार शिक्षण घेणे आणि चांगल्या पद्धतीने नोकरी, व्यवसाय करून स्वतःच्या कुटुंबाला मोठं करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. देश आणि जग फिरा, नवीन तंत्रज्ञान, विज्ञान आणि स्किल आत्मसात करा, विज्ञानवादी बना. चार चांगले दिवस आले म्हणून राजकारण हे तुमचे ध्येय अजिबात ठेवू नका, तुम्ही मोठे झाल्यानंतर ईतरांना हातभार लावा, तरच या सगळ्या संघर्षाचे फलित होईल,'' असं मतही आमदार पंडित यांनी व्यक्त केले. दरम्यान, ''एक चांगला माणूस आणि समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करा, सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी प्रयत्न करा, शासना कडून प्रशासकीय पातळीवर काम सुरू झाले आहे, तुम्ही सुद्धा पुढे येऊन त्याचा लाभ घ्यावा, हीच या माध्यमातून विनंती आहे,'' अशा भावना विजयसिंह पंडितांनी व्यक्त केल्या आहेत.

----------

### डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन रद्द तर

बदल्याच्या आदेश काढले आहेत. त्यामध्ये बीडचे तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांचाही समावेश असून कोविड काळातील गैरव्यवहार प्रकरणी ठपका ठेवून त्यांना निलंबित करण्यात आले होते. आता त्यांचे निलंबन मागे घेत त्यांची नियुक्ती संचालक वैद्यकीय महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीमध्ये संचालक म्हणून करण्यात आली आहे. त्यासोबतच जिल्हा रुग्णालयाचे तात्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्यकांत उर्फ सुरेश साबळे यांची रायगड येथे बदली करण्यात आली होती मात्र आता रायगड येथून त्यांना माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक म्हणून डॉ.कट्टे यांच्या रिक्त झालेल्या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. हा आदेश राज्याच्या आरोग्य विभागाने काढला आहे.

--------------

### राज-उद्धव यांची पुन्हा

म्हणजे शिवतीर्थावर भेट घेण्यासाठी गेले. त्यांच्या सोबत शिवसेनेचे संजय राऊत आणि अनिल परब हे महत्वाचे नेते होते. मनसेकडून बाळा नांदगावकर देखील या भेटीदरम्यान उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. ही भेट गेल्या अनेक भेटींप्रमाणे कौटुंबिक नव्हती. त्यामुळे राजकीय वर्तुळात या भेटीची जोरदार चर्चा सुरू झाली. या भेटीनंतर मनसे नेते राज ठाकरे यांनी एक मोठा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची गुरूवारी एक बैठक बोलावली आहे. या बैठकीत शिवसेनेकडून आलेल्या दसऱ्या मेळाव्याच्या आमंत्रणाचे काय करायचे याबबत चर्चा होण्याची दाट शक्यता आहे. या बैठकीनंतर राज ठाकरे हे आपला निर्णय जाहीर करतील अशी शक्यता आहे. त्यामुळे आता मनसेच्या होणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीकडं सर्वांचे क्ष लागले आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंना शिवसेनेच्या दसरा मेळाव्यासाठी निमंत्रण दिले आहे त्यामुळे हे दोन्ही ठाकरे बंधू पुन्हा एकदा एकत्र येणार आणि या दोघांच्या मुलूख मैदानी तोफा पुन्हा धडाडणार अशी आशा शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांना आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५



## थोडक्यात...

### आसाराम मेहरकर सेवानिवृत्त

नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्र.शा.स. आसाराम मेहरकर हे ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत-वयोमानानुसार दि.३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले. आसाराम मोहनराव मेहरकर यांचे प्राथमिक शिक्षण जि. प. प्रा. शाळा चिंचोलीमाळी तर माध्यमिक शिक्षण कर्मवीर विद्यालय चिंचोलीमाळी ता.केज जिल्हा बीड येथे झाले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी ता. गेवराई येथे सेवक या पदावर काम केले. सन १९९३ ते २००० या काळात प्रयोगशाळा परिचर म्हणून तर २००७ पासून ३१ऑगस्ट २०२५ पर्यंत गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी येथे प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून सेवा केली. ३९वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियमनुसार ३१/०८/२०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले.



### विमल कदम यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील विमल रामभाऊ कदम वय ८० यांचे बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचे पहाटे ४ वाजता निधन झाले त्यांच्या पार्थिवावर शेकापूर रोडवरील खंडोबा मंदिराजवळील स्मशानभूमीत सकाळी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.दिलीप कदम,प्रकाश कदम यांच्या त्या मातोश्री होत्या तर पत्रकार अविनाश कदम, बाबासाहेब कदम, कैलास कदम यांच्या चुलती होत्या आणि हरि कदम, किरण कदम,पवन कदम यांच्या आजी होत्या.



### भिल्ल समाजाला महसुलने दिले घरपोच दाखले

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील दादेगांव येथे वास्तव्यास असलेल्या भिल्ल समाजाला स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच महसूल विभागाने तहसिलदार वैशाली पाटील यांच्या पुढाकारातून घरपोच जाऊन जन्म नोदणी,मतदार नोंदणी व फिरत्या शिधा पत्रिका भिल्ल कुटुंबांना दाखल्याचे वाटप करण्यात आले.

आष्टी तालुक्यातील दादेगांव येथे मोठ्या प्रमाणावर भिल्ल समाज अनेक वर्षांपासून वास्तव्य करीत आहे.हा समाज दाखले मिळविण्यासाठी अनेक वर्षांपासून झगडत आहे.परंतु अखेर तहसिलदार वैशाली पाटील यांच्या पुढाकारातून रविवार (दि.७)रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सर्व विभागांचे प्रमुख घेऊन जाऊन फिरत्या शिधापत्रिका २२,मतदार नोंदणी ८०, व जन्म नोंद आदेश ४३ देण्यात आले.यावेळी तहसिलदार पाटील म्हणाल्या,या दाखल्यांमुळे,भिल्ल समाजातील येणारी पिढी ही,चांगल्या प्रकारचे शिक्षण घेऊन,सुशिक्षित होईल.तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभही,या समाजातील कुटुंबांना मिळण्यास मदत होणार आहे असे त्यांनी सांगितले. या शिबीरात,तहसील कार्यालयातील दिलीप गालफाडे,शिव गारोळे,नंदकुमार कदम,सुशील क्षीरसागर,सुशील शिंदे,अक्षय बोदांर्डे,विशाल मोकशे, अजिनाथ बनकर, बाळू मोटे, ग्रा. म. अ. केमधारणे,समीक्षा क्षीरसागर,गोलांडे यांनी परिश्रम घेऊन हे शिबीर यशस्वी करण्यास सहकार्य केले.

# दुष्काळग्रस्त बीडसाठी विशेष निधी आणि मंजूरी द्या

## खा. सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांची भेट घेवून केली मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा दुष्काळग्रस्त आहे. पायाभूत सोयी-सुविधा पण कमी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय ऊर्जा आणि गृहनिर्माण तथा शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दि.१० रोजी खा.सोनवणे यांनी मुंबई येथे मंत्री खट्टर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

बीड जिल्ह्यात विविध विकास योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात नवी वीज सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर गावागावात स्थिर वीजपुरवठा व्हावा म्हणून ही गरज आहे. शेतकऱ्यांना सौर पंप (पीएम-कुसुम योजना) शेतीसाठी पाणीपुरवठा सोपा होईल. शहरी भागात



स्मार्ट मीटर व भूमिगत केबल वीज चोरी थांबेल आणि सुरक्षित वितरण होईल.सौर-पवन ऊर्जेचे प्रकल्प जिल्ह्याला हरित ऊर्जा उत्पादनाचं नवं केंद्र बनवता येईल. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहरातल्या गरीब व मध्यमवर्गीयांना परवडणारी घरं उपलब्ध होतील. अमृत २.० मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज व स्वच्छता योजना झ्र स्वच्छ वातावरणामुळे आजारपण कमी होईल. बसस्थानक, रस्ते, उद्यानांचं आधुनिकीकरण प्रवास व दैनंदिन सोयीसुविधा सुधारतील. ई-वाहन चार्जिंग हब बीड जिल्हा ई-वाहन वापरासाठी पुढारलेला ठरेल. या प्रकल्पांमुळे बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल आणि जनतेच्या जीवनमानात मोठा फरक पडेल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, खा.सोनवणे हे सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न करत असून केंद्रीय मंत्र्यांकडे ते बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न सातत्याने मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी अनेक मंत्र्यांच्या भेटी घेवून बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे.

## प्रभाग क्रमांक सहामध्ये सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

पाटोदा । प्रतिनिधी

भांड्या वाल्याचे घर ते वार्ड क्रमांक एकचा नालापर्यंत झालेल्या सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले दीड वर्षाच्या आत च जागोजागी सध्या खड्डे पडले आहेत तर अनेक जागेवर खचल्याचा प्रकार आहे तरी याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी माऊली नगर येथील नागरिकांनी केली आहे.. याबाबत अधिक माहिती पाटोदा शहरातील असणाऱ्या माऊली नगर भागातील भांड्यावाल्याचे घर ते वार्ड क्रमांक एकच्या नाल्यापर्यंत झालेल्या



सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून बहुतांश ठिकाणी सध्या या रस्त्यावर खड्डे पडले असून जागोजागी खचण्याचे दाट शक्यता आहे तरी याकडे वरिष्ठाने दखल घेऊन सदर कामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी माऊली नगर येथील नागरिकांनी केली आहे

## भगवान कॉलेज व कॉलेजचा परिसर स्वच्छता अभियान राबवले

**आष्टी । प्रतिनिधी**

भगवान कॉलेज प्रांगणामध्ये सकाळच्या प्रहरी मॉर्निंग वॉक प्राणायाम करण्यासाठी येणाऱ्या आर्य प्रभात ग्रुप व भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी सरावा करिता येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनी व माजी कृषी आयुक्त सुनील दादा चव्हाण अँड रत्नदीप बापू निकाळजे सेवानिवृत्त प्राध्यापक भा दे जगताप व माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे मोहन गलांडे इंजिनियर देशमुख राजू काका धोंडे लॅबरोटियन नागेश कारंडे, बाबाजी अकॅडमी चे राहुल जाधव सर या सर्वांनी मिळून भगवंत कॉलेजमध्ये बुधवारी स्वच्छता अभियान राबवले यामध्ये प्रांगणामधील गवत असेल कचरा असेल सर्व गोष्टीचा निचरा केला सुनील दादा चव्हाण हे आपल्या जन्मभूमी मध्ये आष्टी गावांमध्ये यापूर्वी देखील त्यांनी आष्टी



ग्रामीण रुग्णालयातील परिसरामध्ये आर्य प्रभात ग्रुपच्या मदतीने स्वच्छता अभियान राबवले होते संत गाडगेबाबांच्या आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकाने आपले घर आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे स्वच्छता राखली पाहिजे असा संदेश उपस्थित त्यानां सुनील दादा चव्हाण यांनी दिला.

## लोकशाहीचा गळा घोटणारे जनसुरक्षा विधेयक सरकारने तात्काळ मागे घ्यावे-अ‍ॅड.भाई नवले

बीड । प्रतिनिधी

लोकशाहीला बाधा ठरणारे जनसुरक्षा विधेयक तात्काळ रद्द करण्यात यावे या मागणीसाठी आज महाराष्ट्रामध्ये लोकशाही आघाडीच्या वतीने राज्यभरात इंडिया आघाडीच्या वतीने व शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवेदन देवून विधेयकाविरोधात तीव्र निदर्शने करण्यात आली आहेत तरी सरकारने दखल घ्यावी असे या निवेदनाद्वारे शेकापचे बीड तालुका चिटणीस आणि महाराष्ट्र शेकापच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य अ‍ॅड. भाई राजेंद्र नवले यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनामध्ये सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली त्यांनी सांगितले की, सदर विधेयक हे केवळ नक्षलवादाच्या नावाखाली सामान्य नागरिकांवर दडपशाही करण्याचे साधन बनले आहे. ही



लोकशाहीची गळचेपी असून ते स्वीकारार्ह नाही.

अ‍ॅड. नवले यांनी यावेळी असेही निदर्शनास आणून दिले की, जनसुरक्षा विधेयकावर राज्यभरातून तब्बल १३,००० हरकती नोंदवण्यात आल्या होत्या. मात्र, त्याला कोणतेही समाधानकारक उत्तर न देता, भाजप सरकारने हे विधेयक कसल्या आधारावर मंजूर केले याचे उत्तर जनतेला दिले गेलेले नाही.

हे विधेयक जर त्वरित मागे घेण्यात आले नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही अ‍ॅड. नवले यांनी यावेळी दिला. राज्यभरात या विधेयकाविरोधात निर्माण झालेली अस्वस्थता लक्षात घेता, हे विधेयक मागे घेणे ही सरकारची जबाबदारी आहे, असे मत अनेक नागरिक व संघटनांनी व्यक्त केले आहे.

## डॉ. सर्जेराव निमसे यांचा बीड येथे मराठा समाजाच्या वतीने सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या गायकवाड आयोगाचे सदस्य, तसेच मराठवाड्यातील मराठा हे कुणबी आहेत हे सिद्ध करणाऱ्या हैदराबाद गॅझेटच्या जीआरसाठी महत्त्वपूर्ण काम केलेले माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांचा काल बीडहून लातूरला जात असताना शासकीय विश्रामगृहात सत्कार करण्यात आला. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल हा सत्कार करण्यात आला.**

डॉ. निमसे यांनी गायकवाड अहवालात मराठवाड्यातील मराठा कुणबी आहेत, हे सिद्ध करणारा १५ पानांचा लिखित उतारा समाविष्ट केला होता. या उताऱ्यामुळे मराठा समाजाला



कुणबी दर्जा मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला, ज्यामुळे आता मराठा समाजाला ओबीसी () आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. त्यांचा हा अभ्यासपूर्ण अहवाल हैदराबाद गॅझेटच्या जीआरसाठी अत्यंत उपयुक्त ठरला, ज्यामुळे मराठा आरक्षणाच्या लढ्याला मोठी मदत झाली आहे.

या सत्कार समारंभावेळी माजी आमदार राजेंद्र जगताप, माजी आमदार भाई जनार्दन तुपे, मराठा समाजाचे नेते अशोकराव हिंगे,महादेव आण्णा धांडे, प्राचार्य दिनकर तेलप, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे, अशोक सुखवसे, बापुराव जेधे, आणि प्रा. राजेंद्र गवते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांनी डॉ. निमसे यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांचे आभार मानले. यावेळी बोलताना, डॉ. निमसे यांनी मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहू, असे सांगितले. तसेच, मराठा समाजातील प्रत्येकाने कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## जुलूस मधील मुस्लिम बांधवांना मिठाई देत राजकिशोर मोदी मित्र मंडळाने जपला एकोपा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुस्लिम धर्म गुरू महंमद पैगंबर यांचा जन्मदिवस हा ईद मिलादूनबी म्हणून मुस्लिम बांधव साजरी करतात. ही ईद शुक्रवार दि ५ सप्टेंबर रोजीच झाली . मात्र त्या काळात हिंदू धर्मियांचा गणेशोत्सव सुरू होता . त्यामुळेच अंबाजोगाई शहरात मुस्लिम बांधवानी हिंदू मुस्लिम एकतेचे भावना दाखवत ईदच्या दिवशी निघणारा मुस्लिम बांधवांचा जुलूस हा बुधवार दि १० सप्टेंबर रोजी काढण्याचे मुस्लिम बांधवानी ठरवले. त्याप्रमाणे दि १० रोजी अंबाजोगाई शहरात मुस्लिम बांधवानी मोठा जुलूस (मिरवणूक) काढला होता. या जुलूसमध्ये शेकडो मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.



या जुलूसमध्ये सहभागी झालेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत मिठाई वाटून जोरदार स्वागत केले. जुलूसमध्ये मिठाई देत राजकिशोर मोदी व मित्र मंडळाने हिंदू मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडविले. यावेळी जुलूस मध्ये मोदी यांच्या सोबत बबन लोमटे, शहराध्यक्ष महादेव आदमाणे, धम्मा सरवदे उपाध्यक्ष सय्यद रशीद, खालेद चाऊस, डॉ राजेश इंगोले, पंडित हलगुंडे, किशोर परदेशी, विजय रापतवार , अंकुश हेडे, सुभाष पाणकोळी,भिमसेन लोमटे, अशोक जेधे, गणेश मसने, शाकेर काझी, जावेद गवळी, सुशील वाघमारे, अक्बर पठाण, खलील जाफरी, कैलास कांबळे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, विशाल पोटभरे , उज्जेन बनसोडे, शेख अस्लम, रोशन लाड यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

## कानिफनाथ विद्यालयात आरोग्य व शिक्षण यावर कार्यशाळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

मोहखेड येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित कानिफनाथ विद्यालयात शाळा आरोग्य व शिक्षण या विषयावर एक विशेष कार्यशाळेचे सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्य आणि शिक्षणाबाबत माहिती सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख यांनी दिली.

या सत्रात विद्यार्थ्यांना स्वच्छता, योग्य आहार, व्यायाम आणि मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व समजावले. किशोरवयीन मुलांमध्ये होणारे बदल तसेच या बदलाला कसे सामोरे जायचे याविषयी विस्तृत माहिती देण्यात आली. शैक्षणिक यशासाठी शारीरिक व मानसिक आरोग्य हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्राचार्य अन्वर शेख यांनी नमूद केले. तसेच



आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्या ध्येयाशी वचनबद्ध राहून सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जर वचनबद्धता आणि सातत्य असेल तर आपल्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि हाच आत्मविश्वास आपल्याला यशाकडे घेऊन जातो असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात आरोग्याच्या चांगल्या सवयी लावण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा प्रकारचे सत्र विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्यांनी पुढेही अशा उपक्रम राबवण्याची भूमिका मांडली. या सत्राने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य आणि शिक्षण याबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्याचे दिसून आले.

## कर्मचारी वेळेवर येत नसल्याने गटविकास अधिकाऱ्यांनी काढली नोटीस

पाटोदा । प्रतिनिधी

पंचायत समितीमध्ये कार्यालयीन वेळेत कर्मचारी हे वेळेवर येत नसल्याने गटविकास अधिकारी यांनी नोटीस काढली असून पण या नोटिसीलाही कर्मचाऱ्यांनी केराची टोपली दाखवली आहे.

याबाबत अधिक माहिती शेतकऱ्यांसाठी विविध अडचणी निर्माण सध्या होऊ लागल्या असून पाटोदा पंचायत समितीमध्ये वेळेवर अधिकारी सह कर्मचारी येत नसल्यामुळे वारंवार तक्रारी वाढत आहेत बहुतांशी लोकांची कामे हे होत नसून ग्रामीण भागातील आलेले नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असून पंचायत समितीचा सकाळी वेळ ९.४५ ते ६:१५ असून मात्र या वेळेत कर्मचारी कधीही हजर राहत नसून याबाबत नूतन गटविकास अधिकारी यांनी लेखी नोटीस संबंधित कर्मचाऱ्यांना बजावली असून तरीसुद्धा मात्र कर्मचारी वेळेवर हजर राहत नसून या गटविकास अधिकारी यांच्या नोटीसिला मात्र कर्मचाऱ्यांनी केराची टोपली दाखवली असलेली समजते याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी तात्काळ लक्ष देऊन पाटोदा पंचायत समिती चालू असलेल्या सावळा गोंधळाची पाहणी करून योग्य ती संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## आष्टीतील एवरेस्ट अबकस अकडमीची ४० वी.नॅशनल लेवल कॉम्पिटिशन एक वैशिष्ट्यपूर्ण - डॉ.अजय धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टीमध्ये पहिल्यांदाच होणारी पालकांच्या अग्रहाने ४० वी. नॅशनल लेवल कॉम्पिटिशन असून या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सहभागी झाले आहेत.ही कॉम्पिटिशन एक वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. एवरेस्ट अबॅकस अकॅडमीमध्ये लाखो विद्यार्थी शिकत असून त्यातील ८० टक्के विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. अकॅडमीमध्ये सर्व महिला शिक्षिका आहेत.गुणवत्ता व प्रामाणिकपणा यामुळे अकॅडमी अल्पावधीत यशाच्या शिखरावर पोहोचली आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांचा लाभ घ्यावा आष्टीतील ४० वी. नॅशनल लेवल कॉम्पिटिशन एक वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे प्रतिपादन डा.अजयदादा धोंडे यांनी केले.

आष्टी येथे ४० वी.नॅशनल लेवल कॉम्पिटिशनच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी आष्टीचे नायब




तहसिलदार भगीरथ धारक, लिटिल एंजेल स्कूल घोगरगावचे प्रकाश बोरुडे, पं.स.चे मा.सदस्य दादासाहेब जगताप,आर्मी पब्लिक स्कूल अ‍ॅन्ड जुनियर कॉलेजचे संस्थाध्यक्ष संजय खराडे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार शरद रेडेकर,आदर्श शिक्षीका सौ.आशा रंगनाथ धोंडे - शिंदे, मा.पंचायत समिती उपसभापती सिध्देश्वर देशमुख,जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय उपाध्यक्ष सौ. सुवर्णाताई गि-हे,बावी येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाचे पुंडलीक लटपटे,शिराळ येथील किलबिल त्रिमूर्ती पब्लिक स्कूलचे संस्थाध्यक्ष सुधीर करडुले,प्रा.दत्तात्रय करडुले, सिने बालकलाकार साईराज सरडे,सिने बालकलाकार अनुजा शिंदे,रामलिंग राजमाने आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रस्ताविक डा. कल्पना घडेकर यांनी केले. अबॅकस विद्यार्थ्यांना अंकगणित आणि गणितीय संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करते.शिकण्याची प्रक्रिया सोपी होते:अबॅकस विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रक्रिया सोपी आणि मजेदार बनवतो. अबॅकसचा उपयोग कोणत्या परीक्षांमध्ये होतो.अबॅकसचा उपयोग विद्यार्थी देशातील सर्व स्पर्धा परीक्षांसाठी होतो.उदा. स्कॉलरशिप,ऑलंपियाड,मंथन,प्रज्ञाशोध यांसारख्या परीक्षा ११ वी,१२ वी. , या विषयांमध्ये बारावीनंतरच्या , व इतर प्रवेश परीक्षांसाठी सर्वाधिक उपयोग होतो. यावेळी एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी बेस्ट टीचर अवार्ड सौ.पूनम धोंडे,सौ. प्रियंका शिंदे,मास्टर ऑफ अबॅकस पदवी संग्राम सुभाष बेरड, अपर्णा विनायक धामणे,नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशन चॅम्पियन विद्यार्थी संग्राम भोगाडे,विश्वास नागवडे, रुद्र बोडखे,श्रेया पवार,सोहम बडे, माहेश्वरी शेवाळे,ओवी नजन,पंकज ढाकणे,युवराज ढवळे,जानवी नागरे,जयेश निंबाळकर,उदय आंधळे,आर्या एकशिंगे,संग्राम बेरड यांचा समावेश आहे.या कार्यक्रमाचे बहारदार संचलन अमोल बागुल यांनी तर उपस्थितीतांचे आभार आण्णासाहेब शिंदे यांनी मानले.

## शेख शाकेर अहमद यांच्या सह शेकडो कार्यकर्ते तरुणांचा वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश

**परळी । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी परळीतील मुस्लिम समाजाचे युवा नेते शेख शाकेर अहमद यांच्या सह इतर समाजातील तरुणांनी आज दिनांक १० सप्टेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर पक्षप्रवेश केला. पक्ष प्रवेश करणा-या सर्वांचे मिलिंद घाडगे यांनी स्वागत केले.

वंचित बहुजन आघाडीच्या जिजामाता उद्यानातील पक्ष कार्यालयात संपन्न झालेल्या या जाहीर कार्यक्रमात समता सैनिक दलाचे कॅप्टन डॉ.स्वप्नील महाळंगीकर,ता.अध्यक्ष गौतम साळवे, ता.युवक अध्यक्ष राजेश सरवदे, शहर उपाध्यक्ष धम्मानंद



क्षीरसागर, ता.महासचिव ज्ञानेश्वर गिते यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश घेण्यात आला.याप्रसंगी अकबर शेख,शेख मुजमील,शेख सलीम,सय्यद तुराब,सय्यद इम्तीयाज,सय्यद लायक,सागर कांबळे,अजय जाधव, विशाल अली शेख,ओम कराड, आदित्य व्हावळे,अरुण कराळे,अजय साबणे, अविनाश कराळे, वैभव लिंबुटकर,दिपक व्हावळे, केदार भातांगळे,विजय बुद्रे, रोहित पवार , कृष्णा देशमुख,अजय ठाकूर, प्रसाद कराड, समर्थ मुंडे, वैजनाथ कराळे, बिलाल कच्छी, विशाल ओगले, यांच्या सह असंख्य कार्यकत्यांनी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला. यानंतर जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले तसेच परळी तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचे संघटन वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी वंचितचे सुभाष रोडे, बाळासाहेब कीरवले, भास्कर नावंदे,रवी मुंडे, आदेश पैठणे,सोनु वाघमारे, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अनेक तरुण कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे परळी तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचे ताकद वाढली आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.११ सप्टेंबर २०२५
४

# राज्यात बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेस गती येणार

## आता तयार होणार मजबूत रस्ते



पुणे

बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेस गती देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने १७ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष मोहिम राबवण्यात येणार आहे. या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना राज्यस्तरीय समितीची बैठक महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी विधानसभाक्षेत्र निहाय समिती स्थापन केली जाणार असून या समितीचे अध्यक्ष संबंधित विधानसभा क्षेत्राचे आमदार राहतील. विधानसभा क्षेत्रनिहाय समितीचे सदस्य सचिव प्रांतअधिकारी राहणार असून त्यांच्या समवेत समितीमध्ये महसूल, पोलीस , ग्रामविकास अधिक विभागाचे अधिकारी असतील. तांत्रिक व कार्यकारी यंत्रणेच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अभ्यास गटाने याबाबत आराखडा तयार करावा, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ग्रामीण भागात रस्त्यांची कामे दर्जेदार होत आहेत. बळीराजा शेत पाणंद रस्ते मोहिमेस गती देण्यासाठी शासनाने शासन निर्णय निर्गमित केला असून गाव पातळीवर याची अंमलबजावणी सुरू होत आहे. या अनुषंगाने शेत व पाणंद रस्त्याची कामे गुणवत्ता पूर्ण काम होण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. शेत पाणंद रस्ते बनविताना प्रामुख्याने माती, मुरूम व खडी याचा वापर होत असल्याने त्या माध्यमातून तयार होणारे थर आणि त्यांची मजबुती याकडे लक्ष दिले जावे असे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले. रोजगार हमी योजना मंत्री गोगावले म्हणाले, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या समन्वयाने महाराष्ट्रात राबविली जात आहे. यातून असंख्य कामे सुरु आहेत. बळीराजा शेत व पाणंद रस्ते मोहिमेत देखील चांगली कामे करण्यात येतील. राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, शेत व पाणंद रस्ते योजनेमुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या तंट्यांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

अतिरिक्त मुख्य सचिव श्री. खारगे यांनी योजनेसाठी अभ्यास गटाने तयार केलेल्या उपाययोजनाची माहिती दिली. बैठकीमध्ये उपस्थित सदस्य आमदार यांनी चर्चेत सहभाग घेऊन बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना अंमलबजावणी व कार्यवाहीसाठी विविध मुद्दे व सूचना मांडल्या. शेत व पाणंद रस्ते नोंद करण्यास प्राधान्य देताना, रस्ते नोंद नकाशे ग्राम पंचायत स्तरावर प्रदर्शित करणे यासह मंजूर केलेले रस्ते खुले करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## भारतीय हवामानास अनुकूल डुरम गव्हाची जात 'पुसा गौरव'



डुरम गव्हाची पुसा गौरव (८८४०) ही प्रसिद्ध झालेली जात भारतातील विशेषतः द्वीपकल्पीय आणि मध्यवर्ती प्रदेशात गव्हाच्या लागवडीत क्रांती घडवून आणू शकते.

उच्च उत्पादन, हवामानातील लवचिकता आणि पौष्टिक गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून विकसित केलेली पुसा गौरव ही जात धान्य भरण्याच्या अवस्थेत मर्यादित पाण्याची उपलब्धता आणि उच्च तापमान यासारख्या आव्हानांना तोंड देऊ शकते.

पुसा गौरव गहू जातीची मुख्य वैशिष्ट्ये आणि फायदे

मर्यादित सिंचन परिस्थितीत या जातीचे सरासरी धान्य उत्पादन ३०.२ क्विंटल प्रति हेक्टर असून पाण्याच्या योग्य उपलब्धतेत या वाणाचे प्रति हेक्टर उत्पादन ३९.९ क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत जाते. पुसा गौरव हे चेक वाणांपेक्षा २.४ ते १३.१ टक्के जास्त उत्पादन देते. मध्यम उंची असलेल्या या वाणाची झाडे बळकट असून वेगवेगळ्या पाण्याच्या परिस्थितीतही ते तग धरून राहू शकते. ही जात काळ्या आणि तपकिरी तांबेरा या गहू पिकाच्या उत्पादनावर परिणाम करणाऱ्या रोगांना प्रतिकारक आहे, त्यामुळे पिकांचे आरोग्य चांगले राखून उच्च उत्पादनाची हमी देते. पुसा गौरव ही जात कमी उष्णता, आणि दुष्काळी परिस्थिती, उच्च तापमान आणि पाण्याची टंचाई यासारख्या हवामानाशी संबंधित आव्हानांचा योग्य प्रकारे सामना करू शकते. त्यामुळे या भागातील शेतकर्यांसाठी हा एक आदर्श पर्याय आहे.

पुसा गौरव ही बायोफोर्टिफाइड गव्हाची जात असून झिंक (४१.१ पीपीएम), लोह (३८.५ पीपीएम), आणि प्रथिने सामग्री (१२%) यासह आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहे. यामुळे उच्च उत्पादन सोबतच ग्राहकांसाठी पोषकदृष्ट्या उत्कृष्ट पर्याय देखील बनते. उच्च-गुणवत्तेचा पास्ता तयार करण्यासाठी हा वाण आदर्श आहे, त्याच्या उच्च पिवळ्या रंगद्रव्याचे प्रमाण (८.१ ) आणि धान्य कडकपणा निर्देशांक (९५) मुळे. यामध्ये ४०.५ मिली एसडीएस मूल्यासह उत्कृष्ट चपाती बनवण्याचे गुण देखील आहेत.

कृषिविषयक वैशिष्ट्ये : वेळेवर पेरणी, मर्यादित सिंचन परिस्थितीसाठी ही जात योग्य आहे. द्वीपकल्पीय आणि मध्य भारतात लागवडीसाठी सर्वोत्तम अनुकूल जात. काढणीस लवकर तयार होणारे वाण आहे. ११०-११५ दिवसात परिपक्व होते. या वाणाची उंची ८०-८५ सेमी असल्यामुळे पिकाला लवचिकता आणि मजबूतपणामध्ये प्रदान करते. १००० धान्याचे वजन ४७ ग्रॅम आहे जे त्याच्या चांगल्या धान्याचा आकार आणि गुणवत्तेचे सूचक आहे.

## नैसर्गिक शेतीसाठी फायदेशीर नीमस्त्र, ब्रह्मास्त्र आणि अग्निस्त्र, करतील हानिकारक किडींचा अंत!

कीड नियंत्रण ही नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीत सर्वात मोठी समस्या असते. परंतु काही नैसर्गिक घटकांचा वापर करून शेतकऱ्यांना या किडी आणि रोगांचे नियंत्रण करणे सोपे आहे. आज आम्ही तुम्हाला नैसर्गिक शेतीसाठी फायदेशीर आणि किडींचे नियंत्रण करणारे नीमस्त्र, ब्रह्मास्त्र आणि अग्निस्त्र हे कीटकनाशक यांची उपयुक्तता आणि तयार करण्याची पद्धती याबद्दल सांगणार आहोत.



नीमस्त्र : नीमस्त्र एक कीड नियंत्रक नैसर्गिक काढा आहे. याचा उपयोग पिकावरील रस शोषणाऱ्या किडी/कीटक, पाने पोखरणारी अळी यांच्या नियंत्रणासाठी केला जातो. यासाठी ५ किलो कडुनिंबाची पाने, १०० लिटर पाणी, १ किलो देशी शेण आणि ५ लिटर देशी गोमूत्र आवश्यक आहे. हे सर्व एकत्र एका मोठ्या ड्रममध्ये ठेवावे आणि २ ते ३ मिनिटे ढवळत राहावे. आता या ड्रमचे तोंड सुती कापडाने बांधावे, ४८ तास हे झाकूनच ठेवावे. ४८ तासानंतर कीडनियंत्रक नीमस्त्र तयार होईल. एकदा तयार झाल्यानंतर तुम्ही तुमच्या शेतात ६ महिनेपर्यंत हे नीमस्त्र वापरू शकता. त्याचा वापर करण्यासाठी ५ ते ६ लिटर नीमस्त्र २५० लिटर पाण्यात चांगले मिसळून एक हेक्टर शेतात फवारणी करावी.

अग्नीस्त्र : अग्नीस्त्राचा वापर खोड पोखरणारी अळी, फळ पोखरणाऱ्या अळ्या आणि इतर विविध प्रकारच्या अळ्यांच्या नियंत्रणासाठी करतात. यासाठी सुमारे ५ किलो कडुलिंबाची पाने, अर्धा किलो हिरवी मिरची आणि अर्धा किलो लसूण व २० लिटर गोमुत्र लागेल.

या सर्व गोष्टी नीट बारीक करून मिश्रण तयार करायचे आहे. आता या तयार मिश्रणात २० लिटर गोमूत्र मिसळले जाते आणि सुमारे २० मिनिटे उकळले जाते. हे मिश्रण सुमारे ४८ तास ठेवावे आणि त्यानंतर ते सुती कापडाने गाळून ड्रममध्ये ठेवावे.


५ ते ६ लिटर अग्निस्त्र २५० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी.

ब्रह्मास्त्र : ब्रह्मास्त्राचा वापर पिकांमधील पोखरणाऱ्या किडी, कीटक आणि अळ्या यांना नियंत्रित करण्यासाठी करतात. यासाठी ३ किलो कडुनिंबाची पाने, २ किलो करंज, २ किलो सीताफळ, २ किलो धतुऱ्याची पाने आणि १० लिटर गोमूत्र लागेल.

हे सर्व एकत्र करून मिश्रण तयार करून २० ते २५ मिनिटे उकळावे. ४८ तासांनंतर, हे मिश्रण थंड होऊ द्यावे आणि सूती कापडातून गाळून घ्यावे. ५ ते ६ लिटर ब्रह्मास्त्र २५० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर जमिनीवर फवारणीसाठी वापरावे.

## झाडावरील केळीचे घड पिशवीने झाकण्यामुळे होतात आश्चर्यकारक फायदे!

केळी उत्पादक शेतकरी केळीचे घड पिशव्यांनी झाकतात ही एक सामान्य कृषी पद्धत आहे ज्यामुळे फळांचे विविध पर्यावरणीय घटक, कीटक आणि रोगांपासून संरक्षण होते. सामान्यत: या पिशव्या पॉलिथिन, न विणलेले फॅब्रिक किंवा कागदासारख्या सामग्रीपासून बनविलेल्या असतात. केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने अनेक फायदे मिळतात. आधुनिक केळी शेतीमध्ये ही एक आवश्यक क्रिया आहे. केळीचे घड पिशवीने झाकण्याचे अनेक फायदे आहेत.



कीटक आणि रोगांपासून संरक्षण :

केळीचे घड पिशवीत ठेवण्याचे मुख्य फायदे म्हणजे ते विविध कीटक आणि रोगांपासून संरक्षण प्रदान करते. फुलकिडी, फळमाशी आणि इतर कीटक यांसारख्या कीटकांमुळे केळीच्या फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, ज्यामुळे चट्टे, डाग आणि इतर गुणवत्तेच्या समस्या निर्माण होतात. तसेच या किडी आणि रोगांना पिशव्या अडथळा म्हणून काम करतात, ज्यामुळे या कीटकांना फळांपर्यंत पोहोचण्यापासून प्रतिबंध होतो. आर्द्र वातावरणात जेथे करपा आणि सिगार रॉट सारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. बॅगिंगमुळे एक सूक्ष्म वातावरण तयार होते जे फळांच्या पृष्ठभागाशी ओलावा कमी करते, ज्यामुळे अशा रोगांचे प्रमाण कमी होते. यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. सुरक्षित, कीटकनाशकमुक्त फळ उत्पादित होते. याव्यतिरिक्त, पावसाळ्यात फळांना पिशव्या मातीच्या कणांपासून दूषित होण्यास प्रतिबंध होते.

फळांची चांगली गुणवत्ता : केळीची गुणवत्ता वाढवण्यात बॅगिंग महत्त्वाची भूमिका बजावते. पिशव्या धूळ, घाण आणि यांत्रिक नुकसान यासारख्या बाह्य घटकांपासून फळांचे संरक्षण करतात. परिणामस्वरुप, केळी गुळगुळीत त्वचेसह एकसमान आकार विकसित करतात, त्यावर कोणतीही खूण किंवा डाग नसतात. निर्यातक्षम केळीसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. केळीची गुणवत्ता हा बाजारभावाचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. याव्यतिरिक्त, पिशव्या सूर्य प्रकाशामुळे होणारी सन बर्निंग कमी करण्यास मदत करते, थेट सूर्यप्रकाशापासून फळांचे संरक्षण करून, बॅगिंग केळीचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवते, ज्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. त्यामुळे शेतकर्यांना बाजारात जास्त भाव आणि अधिक नफा मिळतो.

फळांची चांगली वाढ आणि परिपक्वता : केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने फळांच्या सभोवतालच्या सूक्ष्म वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे फळांची वाढ, आकार आणि परिपक्वता चांगली राहते. पिशव्या फळांच्या सभोवतालच्या ओलाव्याची योग्य पातळी राखण्यास मदत करतात, जे फळ भरण्यासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. हे नियंत्रित वातावरण फळांचे वजन आणि आकार सुधारू शकते, ज्यामुळे प्रति घड जास्त उत्पादन मिळते. शिवाय, बॅगिंगमुळे केळी मजबूत होतात आणि त्यांचे शेल्फ लाइफ वाढते, जे स्थानिक बाजारपेठ आणि निर्यात दोन्हीसाठी फायदेशीर आहे.

काढणी नंतरचे नुकसान कमी करणे : काढणीनंतर, विशेषतः हाताळणी, वाहतूक आणि साठवण दरम्यान केळीचे लक्षणीय नुकसान होते. कापणीपूर्व अवस्थेत बॅगिंगमुळे संरक्षणाचा अतिरिक्त थर देऊन हे नुकसान कमी करण्यात मदत होते. फळांचा दर्जा चांगला आणि नुकसानीचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणजे पॅकिंग अवस्थेत आणि वाहतुकीदरम्यान कमी फळे खराब होतात. याव्यतिरिक्त, बॅगिंगमुळे पिशव्या फळांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे फळांचे वजन कमी होत नाही. उच्च तापमान असलेल्या भागात किंवा कोरड्या हंगामात जेव्हा निर्जलीकरणाचा धोका जास्त असतो तेव्हा हे विशेषतः महत्त्वाचे आहे.

पर्यावरणास अनुकूल : कीटकनाशकांच्या अति वापरासाठी बॅगिंग हा पर्यावरण पूरक पर्याय आहे. रासायनिक हस्तक्षेपाची गरज कमी करून, ही पद्धत केळीच्या टिकाऊ उत्पादनात योगदान देते. हे सेंद्रिय आणि कीटकनाशक-मुक्त उत्पादनासाठी देते. बायोडिग्रेडेबल किंवा पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या वापरल्याने टिकाऊपणा आणखी वाढते, ज्यामुळे पर्यावरणीय प्रभाव कमी होतो.

खर्चात बचत : पिशव्यांमधील सुरुवातीची गुंतवणूक अतिरिक्त खर्चासारखी वाटत असली तरी कीटकनाशके, फळांचा दर्जा आणि उच्च बाजारभाव या दृष्टीने दीर्घकालीन फायदे बॅगिंगला किफायतशीर पर्याय बनवतात. उत्पादनात वाढ आणि काढणी नंतरच्या नुकसानीतील घट यामुळे बॅगिंगची गुंतवणूक अधिक योग्य वाटते.

हवामानास अनुकूल : अतिवृष्टी किंवा जोरदार वारा यांसारख्या परिस्थितीत, बॅगिंगमुळे फळांच्या घडांना अतिरिक्त संरक्षण मिळते. पिशव्या गारपीट, मुसळधार पाऊस आणि काही बाबतीत पानांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात. यामुळे हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी आणि बदलत्या हवामानाच्या पद्धती असूनही सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी बॅगिंग हा एक मौल्यवान उपाय आहे.




### महत्वाच्या घटना

१२९७ : स्टर्लिंग ब्रिजच्या लढाईत स्कॉटिश सैन्याने इंग्लंडचा पराभव.
१७७३ : बेंजामिन फ्रँकलिनने रुल्स बाय विच ए ग्रेट एम्पायर मे बी रिड्युस्ड टू ए स्मॉल वन हा निबंध प्रकाशित केला.
१७९२ : होप हिरा चोरला गेला.
१८९३ : स्वामी विवेकानंद यांनी जागतिक सर्वधर्म परिषदेसमोर आपले गाजलेले भाषण केले.
१९०६ : म. गांधींनी द. आफ्रिकेत सत्याग्रह हा शब्द पहिल्यांदा वापरला.
१९१९ : अमेरिकन सैन्याने होंडुरास ताब्यात घेतले.
१९४१ : अमेरिकेने पेंटागॉन बांधायला सुरुवात केली.
१९४२ : आझाद हिंद सेनेने जन गण मन राष्ट्रगीत म्हणून गायले.
१९६१ : 'विश्व प्रकृती निधी' ची स्थापना झाली.
१९६५ : भारत पाक युद्ध भारतीय सैन्याने लाहोरजवळील बुर्की गाव ताब्यात घेतले.
१९७२ : नाट्यमंदार निर्मित आणि प्रा. मधुकर तोरडमल लिखित व दिग्दर्शित 'तरुण तुर्क, म्हातारे अर्क' या नाटकाचा पहिला प्रयोग इचलकरंजी येथील डेक्कन स्पिनिंग मिलच्या गणेशोत्सवात झाला. थिएटरमधील पहिला प्रयोग ५ आक्टोबर १९७२ रोजी मुंबईच्या रविंद्र नाट्यमंदिरात झाला.
२००१ : अमेरिकेत ठिकठिकाणी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात २९९६ लोक ठार झाले. यावेळी अध्यक्ष जॉर्ज बुश यांना तातडीने अज्ञातस्थळी हलवले गेले. अमेरिकेचे जर एखाद्या देशाशी अणूयुद्ध झालेच तर राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षिततेसाठी अमेरिकेत ७५ हून अधिक ठिकाणी जमिनीखाली विषेश व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. पेंटॅगॉन या अमेरिकेच्या लष्करी मुख्यालयावर झालेल्या हल्ल्यात सुमारे दहा कोटी डॉलरचे नुकसान झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१६ : जर्मन संशोधक कार्ल झाइस यांचा जन्म.
१८६२ : इंग्लिश लेखक ओ. हेन्री यांचा जन्म.
१८८४ : भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी सुधीमय प्रामाणिक यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑक्टोबर १९७४)
१८८५ : डी. एच. लॉरेन्स इंग्लिश कादंबरीकार, कवी, नाटककार, टीकाकार आणि चित्रकार (मृत्यू: २ मार्च १९३०)
१८८८ : अर्टिजेंनाचे राष्ट्राध्यक्ष दॉमिंगो फॉस्तिनो सार्मियेंतो यांचे निधन.
१८९५ : आचार्य विनोबा भावे भूदान चळवळीचे प्रणेते, महात्मा गांधींचे पट्टशिष्य, भारतरत्न १९८३ मरणोत्तर, १९४० मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या केलेल्या आंदोलनात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. भूदान यज्ञात विनोबांनी देशभर पदयात्रा केली. (मृत्यू: १५ नोव्हेंबर १९८२)
१९०१ : आत्माराम रावजी देशपांडे तथा 'कवी अनिल' साहित्य अकादमी पारितोषिक विजेते, साहित्य संमेलनाचे व साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, 'प्रेम आणि जीवन', ' भग्नमूर्ती', 'चिनी मुलास', 'निर्वासित' ही खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. प्रौढ शिक्षणविषयक कार्यासाठी त्यांना नेहरू पारितोषिक मिळाले होते. (मृत्यू: ८ मे १९८२)
१९११ : भारतीय क्रिकेटपटू लाला अमरनाथ यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट २०००)
१९१५ : पुपुल जयकर सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (मृत्यू: २९ मार्च १९९७)
१९१७ : फर्डिनांड मार्कोस फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २८ सप्टेंबर १९८९)
१९३९ : ॲडॉब सिस्टम चे संस्थापक चार्ल्स गेशेके यांचा जन्म.
१९८२ : तामिळ चित्रपट अभिनेत्री श्रीया शरण यांचा जन्म.
१९८३ : विनोबा भावे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.
१९७६ : भारतीय क्रिकेटर मुरली कार्तिक यांचा जन्म.
१९९७ : नासाचे मार्सग्लोबल सर्व्हेयर हे अंतराळयान मंगळावर पोहोचले.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२१ : सुब्रम्हण्यम भारती तामिळ साहित्यिक (जन्म: ११ डिसेंबर १८८२)
१९४८ : बॅ. मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल (जन्म: २५ डिसेंबर १८७६)
१९६४ : गजानन माधव मुक्तिबोध हिन्दी कवी, लेखक, टीकाकार व संपादक (जन्म: १३ नोव्हेंबर १९१७)
१९७१ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ एप्रिल १८९४)
१९७३ : चिलीचे राष्ट्राध्यक्ष साल्वादोर ॲलेंदे याचं निधन.
१९७३ : भारतीय तत्त्वज्ञ आणि गुरू नीम करळी बाबा यांचे निधन.
१९७८ : बल्गेरियाचे कवी जॉर्जी मार्कोव्ह यांना फाशी देण्यात आली.
१९८७ : महादेवी वर्मा हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ, प्रयाग महिला विद्यापीठाच्या प्राचार्या (१९३३) व कुलगुरू, 'यामा' या काव्यसंग्रहासाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार देण्यात आला. (जन्म: २६ मार्च १९०७)
१९९८ : क्रीडा महर्षी प्रिं. नोशीरवान दोराबजी तथा एन. डी. नगरवाला क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (जन्म: १० आक्टोबर १९०९ अहमदनगर, महाराष्ट्र)



राज्य लोकतंत्र
अहिल्यानगर/जालना
गुरूवार दि.११ सप्टेंबर २०२५ ५



# मेघा इंजिनिअरिंगने वाळू , मुरुम बेकायदेशीर वापर केल्याप्रकरणी तात्पुरती स्थगिती; मात्र ९४ कोटी भरावे लागणार

## आ.रोहित पवार यांनी खोटी माहिती पसरवून जनतेची दिशाभूल केली–आ. बबनराव लोणीकर

जालना । प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८–सी (पंढरपूर–शेगाव–पाळधी) च्या बांधकामादरम्यान मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि., हैद्राबाद यांनी जालना आणि परभणी जिल्ह्यातील परतूर तालुक्यात अनधिकृतपणे वाळू आणि मुरमचे उत्खनन केल्याने निर्माण झालेल्या ९४.६८ कोटी रुपये दंडाच्या वादाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि पर्यावरणीय क्षेत्रात खळबळ उडाली. या प्रकरणात परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ रोजी जालना येथील श्री भक्ती निवास, यशवंत नगर येथे दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत सविस्तर खुलासे केले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे आमदार रोहित पवार यांच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांना सडेतोड प्रत्युत्तर देत त्यांना राजकीय संन्यास घेण्याचा सल्ला दिला.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २५० किलोमीटरच्या पालखी दिंडी मार्गाच्या बांधकामासाठी ही कंपनी कंत्राटदार म्हणून नियुक्त आहे. या प्रकल्पात जालना आणि परभणी जिल्ह्यांचा समावेश आहे. २०१८–१९ मध्ये कंपनीने परतूर तालुक्यात परवानगीशिवाय २६,६६६ ब्रास वाळू आणि ५२,१६६ ब्रास मुरमचे उत्खनन केल्याचा आरोप आहे. यामुळे शासनाला ९४.६८ कोटी रुपये महसुली तोटा झाला. महसूल विभागाने कंपनीवर दंड ठोठावला, ज्यात अपर जिल्हाधिकारी, जालना यांनी ३८.७० कोटी आणि तहसीलदार, परतूर यांनी ५५.९८ कोटी रुपये आकारले. कंपनीने या आदेशांना आव्हान देत अपील दाखल केले, जे अपर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी फेटाळल्यानंतर तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सुनावणीसाठी गेले. २१ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीत कंपनीने दंड माफ किंवा कमी करण्याची मागणी केली, कारण उत्खनन सार्वजनिक हिताच्या महामार्गासाठी होते.

### स्वतः हमी देणार

लोणीकर यांनी पुढे सांगितले की, दंड माफ झाला नसून, फक्त तात्पुरती स्थगिती मिळाली आहे. ''येत्या दोन दिवसांत ९४.६८ कोटी रुपये संपूर्णपणे वसूल केले जातील. याची मी स्वतः हमी देतो,'' असे त्यांनी ठामपणे नमूद केले. त्यांनी उपविभागीय दंडाधिकारी, जालना आणि परभणी यांच्या १८ ऑगस्ट २०२५ च्या पत्रांचा (विनंती क्र. १४/२०२५, १५/२०२५) उल्लेख केला, ज्यात संपूर्ण दंड वसूल करण्याचे आणि न भरल्यास जप्त मालाचा लिलाव करण्याचे निर्देश आहेत. लोणीकर यांनी कंपनीने जमा केलेली १७.२८ लाख रुपये (१% रक्कम) ही तात्पुरत्या निकालीसाठी असल्याचे स्पष्ट केले.फ



मात्र, विखे पाटील यांनी नियमांचे उल्लंघन आणि पर्यावरणीय नुकसान यावर भर दिला. शासनाच्या ठरावानुसार, दंडाच्या १% रक्कम (१७.२८ लाख रुपये) जमा करून प्रकरण तात्पुरते निकाली काढण्यात आले. यामुळे कंपनीचे जप्त साहित्य (५ क्रेन, १२ ट्रक) परत मिळाले. आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले की, ही स्थगिती माफी नव्हे, आणि संपूर्ण ९४.६८ कोटी रुपये वसूल होणार आहेत. आ.लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत या प्रकरणावर सविस्तर भाष्य करत शासनाच्या कारवाई आणि राजकीय आरोपांवर आपली भूमिका मांडली.

त्यांच्या मते, हे प्रकरण तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या काळातील आहे, आणि सध्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर कोणताही दोष नाही. लोणीकर म्हणाले, रोहित पवारांनी बावनकुळे यांच्यावर भ्रष्टाचाराचा जो आरोप केला, तो धादांत खोटा आहे. बावनकुळे यांनी फक्त विधानसभेत प्रश्न क्र. १३६८४ ला उत्तर दिले. पवारांनी हवेत गोळीबार करून जनतेची दिशाभूल केली. त्यांनी आता राजकीय संन्यास घ्यावा. असा सल्ला त्यांनी दिला. स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी या प्रकरणात चौकशीची मागणी केली आहे, कारण यापूर्वी भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत (उदा., स्टील मिनिस्ट्री प्रकरण, कंत्राट रद्द). लोणीकर यांनी यावरही भाष्य केले की, ''शासन पारदर्शकपणे कारवाई करत आहे. कोणत्याही चौकशीला आमची हरकत नाही, पण खोटे आरोप खपवून घेतले जाणार नाहीत. असे शेवटी पत्रकार परिष मध्ये बोलताना आ.बबनराव लोणीकर म्हणाले.

# जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई येथे आयोजित करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असून, त्याद्वारे गुणवान व पात्र कौशल्यधारक स्पर्धकांची निवड केली जाणार आहे. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी संकेतस्थळावर मंगळवार दि. ३० सप्टेंबर पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

ही स्पर्धा दर दोन वर्षांनी होत असून ती जगातील सर्वांत मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा आहे. या स्पर्धेत जगभरातील २३ वर्षाखालील युवक–युवतींना त्यांची कौशल्ये प्रदर्शित करण्याची संधी मिळते. ही स्पर्धा ऑलिंपिक खेळांच्या तोडीस तोड मानली जाते. भारतामधील प्रतिभावान व जिल्ह्यातील इच्छुक युवक–युवतींनी विविध ६३ क्षेत्रांमध्ये होणाऱ्या स्पर्धेत सहभागी कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने, जालना होण्यासाठी मंगळवार दि. ३० सप्टेंबर पर्यंत https://kaushalya mahaswayam.gov.in https://www. skillindiadigital. gov.in/home या सकेतस्थळावर ऑनलाईन नाव नोंदणी करावी. यापुर्वी ४७ जागतिक कौशल्य स्पर्धेमध्ये ६३ सेक्टर मधुन ५० देशातील १०००० उमेदवार समाविष्ट असून, सदर स्पर्धा १५ देशात १२ आठवड्यासाठी आयोजित करण्यात आली होती. यापुढील जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ मध्ये शांघाई येथे आयोजित होणार आहे. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००४ किंवा त्यानंतरच असावा.

शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य, आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरिता सर्व शासकीय आणि खाजगी औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई टूल रूम्स, सिपेट, आयआयटी, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिके तन महाविद्यालये, आयएचएम / हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, कॉर्पोरेट टेक्निकल इंस्टिट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टिट्यूट, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एमएसबीव्हीटी, खाजगी कौशल्य विद्यापीठ, इंस्टिट्यूट ऑफ ज्वेलरी मेकिंग, इतर सर्व प्रशिक्षण संस्था, कला, वाणिज्य, विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य सोसायटीकडे अधिनस्त सर्व व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण संस्था, विविध व्यावसायिक आस्थापना आणि कारखाने यांचेकडील विहीत वयोमर्यादितील इच्छूक प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन या स्पर्धेसाठी करता येईल. तसेच या स्पर्धेत निवड झालेल्या उमेदवारांना वेळोवेळी लागणारे मार्गदर्शन व सहाय्य महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून सांगण्यात आले आहे.

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक :- ०२४८३–२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad@gmail.com
जा...क्र.२०२५/ सेतू/कावि–४४७
दिनांक–२९/०८/२०२५

**विषय जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.**

(जन्म – मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)

अर्जदार श्रीमान / श्रीमती बेबी दगडु जानवे रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या स्वतः च्या दि.०५/०५/१९६४ जन्म – मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबधि त अर्जदार विरुध्द ग्राम पंचायत कार्यालय अंबड नगर पंचायत कार्यालय अंबड यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन याचेकडील शा.नि जमृनों २५२५ (ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि. १२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित्त अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत आक्षेप या कार्यालयास लेखी स्वरुपात सादर करावा.

**स्वाक्षरीत**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

### दारूबंदीसाठी गावच्या रणरागिणी आक्रमक; भोकर ग्रामसभेत एल्गार

श्रीरामपूर । प्रतिनिधी

तालुक्यातील भोकर येथील अवैध धंदे व दारू विक्री रोखण्यासाठी महिलांनी आक्रमक पावित्रा घेतला आहे. ग्रामसभेत या महिलांनी कारवाईची मागणी केली, प्रशासनाला निवेदन दिले. त्यानंतर भरारी पथकाव्दारे भोकरमध्ये कारवाया सुरू झाल्याचे दिसते आहे.

भोकरच्या महिलांनी यापुर्वीही अनेकदा आमदार, तहसीलदार, पोलिस ठाणे, दारूबंदी व उत्पादन शुल्क कार्यालयावर दारूबंदीसाठी मोर्चा काढून दारुबंदी करण्याची मागणी केली. या दरम्यान, आमदार हेमंत ओगले यांनी आठवडा भरात दारूबंदी करण्याचे आश्वासन देवून प्रशासनाला सुचना दिल्या, तर पोलिस निरीक्षक अरूण धनवडे यांनीही त्वरीत कारवाई करण्याचे आश्वासन महिलांना दिले. तत्पूर्वी, भोकर येथे दारुमुळे त्रस्त झालेल्या महिलांनी सोमवार दि. ८ सप्टेंबर रोजी एकत्र येत ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजुर केला. त्यानंतर तालुक्यातील विविध कार्यालयात निवेदन देऊन आपल्या व्यथा मांडल्या. यावेळी सरपंच शितल पटारे, आशांकुर महिला केंद्राच्या सिस्टर प्रिस्का यांच्यासह आदी महिला एकवटलेल्या दिसल्या. भोकर येथे जिल्हा परिषद शाळेसमोर अवैध दारू विक्री व मटका सुरु आहे, तो तत्काळ बंद करावा. व्यसनाधिनतेचा परिणाम शाळकरी मुलावर व अनेकांच्या संसारावर होत आहे तरी तात्काळ दारूबंदी करून महिला वर्गाला दिलासा द्यावा, असे निवेदनात नमुद केले आहे.

निवेदन देताना उपसरपंच संदिप गांधले, रेखा थोरात, सुनिता आहेर, सुदाम पटारे, प्रताप पटारे उपस्थित होते. या निवेदनावर साखरबाई शिंदे, शिला अमोलीक, अनिता शिरसाठ, सुशिला सोनावणे, सुनिता थोरात, चंद्रकला म्हसे, उषा बोधक, शबाना शेख, विमल आहेर, ताराबाई पंडीत, पुजा अमोलीक, छाया साळवे, सोनाली चिलघर, कमल अमोलीक, सुमन अमोलीक, मंदा मोरे, शिला अमोलीक, आशा आहेर, चंद्रभागा आहेर, मनिषा अमोलीक,कमल साळवे, आशा चव्हाण, सुनिता आहेर आदि महिलांच्या सह्या आहेत. महिलांनी निवेदन देताच भरारी पथकाने तातडीने भोकर येथे कारवाई सुरू केली.

### हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र अंतर्गत एनसीसीने केले वृक्षारोपण

#### हरीत जामखेडसाठी राष्ट्रीय छात्र सेना सज्ज

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड नगर परिषद व सतरा महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर संयुक्त विद्यमाने हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र व एनसीसी उपक्रम अंतर्गत भव्य वृक्षारोपण जामखेड येथील तपनेश्वर अमरधाम नदी परिसरात करण्यात आले.

यावेळी जामखेड महाविद्यालय, ल ना होशिंग विद्यालय व रयतचे नागेश विद्यालय जामखेड एनसीसी युनिटने शहरांमध्ये वृक्षारोपण जनजागृती रॅली काढली. झाडे लावा झाडे जगवा, एक पेड माँ के नाम, हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र, या घोषणांनी जामखेडचा परिसर दुमदुमून निघाला. अमरधाम नदी परिसरात रॅलीचा समारोप करून वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने देशी वड, पिंपळ, चिंच, करंजी, नारळ अशा विविध ८० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती जामखेड नगर परिषद मुख्य अधिकारी अजय साळवे, प्राचार्य सुनील पुराणे, प्राचार्य पारखे बीए, प्राचार्य मडके बीके, कॅप्टन गौतम केळकर, सेकंड ऑफिसर अनिल देडे, सेकंड ऑफिसर मयूर भोसले, रामभाऊ मुरूमकर, प्रवीण उगले, कार्यालयीन प्रमुख संभाजी कोकाटे, पाणीपुरवठा अभियंता ज्ञानेश्वर मिसाळ, शहर समन्वयक तुषार केवडे व नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते. यावेळी साकतचे वन विभागातील सेवानिवृत्त रामभाऊ मुरूमकर यांनी ८० झाडे वृक्षारोपणासाठी देऊन संगोपनाची जबाबदारी घेतल्यामुळे एनसीसी व नगरपरिषदेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. मनोगतात मुख्याधिकारी अजय साळवे यांनी शासनाचा हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र अंतर्गत वृक्षारोपण करण्यासाठी जामखेड मध्ये एनसीसी विशेष सहकार्य लाभले, असे म्हटले. पुढील वर्षी या ठिकाणी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत एक नवीन गार्डन करून वृक्षारोपण करणार आहोत. या ठिकाणी आलेल्या लोकांना वृक्षांचा फायदा व्हावा अल्हादायक वातावरण निर्माण व्हावे यासाठी वृक्षारोपण कार्यक्रमास करीत आहोत. हरित जामखेडसाठी सर्व तयार आहोत. १७ महाराष्ट्र बटालियनचे सीओ कर्नल प्रसाद मिझार, एओ कर्नल निकीत नेगी यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. प्रास्ताविक कॅप्टन गौतम केळकर, सूत्रसंचालन सेकंड ऑफिसला अनिल देडे व आभार व नियोजन सेकंड ऑफिसर मयूर भोसले व तुषार केवडे यांनी केले.

## थोडक्यात

### निधी अखर्चित राहिल्यास संबंधित विभाग प्रमुखाला जबाबदार धरणार

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजना २०२५–२६ अंतर्गत मंजूर निधी सर्व विभागांनी वेळेत पूर्ण खर्च करावा. एकही पैसा परत जाता कामा नये. निधी अखर्चित राहिल्यास संबंधित विभागप्रमुखाला जबाबदार धरण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२५–२६ आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कोमल कोरे, जिल्हा नियोजन अधिकारी यांच्यासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, यंत्रणेने जिल्हा नियोजन समितीच्या निधीचा चांगला वापर करणे गरजेचे आहे. काम झालेल्या ठिकाणांचे जिओ टॅगींग छायाचित्रे सादर करावेत. काम अपूर्ण राहिले असल्यास त्याची इत्यंभूत माहिती घेवून बैठकीस हजर राहणे आवश्यक आहे. निधी दिल्यानंतर वेळेत निधी खर्च व्हायला पाहिजे. निधी परत जाणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच काम करण्यासाठी नेहमी उत्साही रहावे. तसेच चुकीची कामे अजिबात खपवून घेतली जाणार नाहीत त्यामुळे नियमानूसार कामे वेळेत करावी अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी २०२४–२५ खर्चाचा आढावा, २०२५–२६ नियोजनाबाबत, अखर्चित निधीबाबत माहिती, स्पिल कामांच्या याद्या व आवश्यक निधी, सन २०२४–२५ पर्यंत प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र याचा आढावा घेण्यात आला. यावेळी आता प्रत्येक कामांना युनिक आयडी देण्यात येणार असल्याचेही नियोजन विभागाकडून सांगण्यात आले.

### निवृत्त अभियंता लाचलुचपतच्या जाळ्यात; श्रीगोंदेमध्ये खळबळ

श्रीगोंदे : रस्ते कामाचा गुणवत्ता निरीक्षण अहवाल मिळवून देण्यासाठी ७ हजारांची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या येथील बांधकाम उपविभागाचे सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता प्रकाश पाचनकर याच्याविरुद्ध श्रीगोंदे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, तक्रारदाराने जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकामविभागाअंतर्गत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणाची दोन कामे घेतलेली आहेत. या कामांचे बिल काढण्यासाठी आरोपी पाचनकर याने गुणवत्ता निरीक्षकाकडून गुणवत्ता अहवाल मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडे दोन कामांचे प्रत्येकी साडेतीन हजार, अशी सात हजार रुपयांची मागणी केली. याबाबत १६ एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी कनिष्ठ अभियंता प्रकाश पाचनकर याने सात हजारांची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवली. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या फिर्यादीवरून आरोपी प्रकाश पाचनकर याच्याविरुद्ध श्रीगोंदे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### श्रीरामपूर पोलिसांकडून तीन मंडळांविरुद्ध गुन्हे

श्रीरामपूर : आवाज मोठा करा म्हणत कायद्याला हरताळ फासणाऱ्यांना श्रीरामपूर पोलिसांनी असा धडा शिकवला की, आता कुणाचंही बीट्स डोक्यावर चढणार नाहीत! गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेवाल्यांनी सर्वोच्च न्यायालय व पोलिसांचे आदेश धाब्यावर बसवत कर्णकर्कश आवाज पसरवला आणि थेट ध्वनिप्रदूषण अधिनियमाचे उल्लंघन केले. परिणामी पोलिसांनी धडक कारवाई करून गुन्हे दाखल करत थेट डीजे सेट जप्त केले.गणेशोत्सवाआधीच सर्व मंडळे व डीजेचालकांना कडक इशारा देण्यात आला होता, तरीही ६ सप्टेंबर रोजी काहींनी बिनधास्त डीजे वाजवून नागरिकांच्या कानठळ्या बसवल्या. अखेर पोलिसांनी एक ना दोन, तर थेट तीन मंडळांना धडा शिकवला. शंभुराजे मित्र मंडळ अध्यक्ष उमेश छल्लारे व डीजेचालक अश्पाक तांबोळी, अष्टविनायक मित्रमंडळ अध्यक्ष जयेश झरेकर व 'गणेश ०९' डीजे मालक गणेश गिते, महाकाल मित्रमंडळ अध्यक्ष सनी गौतम व 'सद्गुरु डीजे' चालक निखिल बनसोडे या सर्वांवर ध्वनिप्रदूषण अधिनियमासह इतर कायद्यांनुसार गुन्हे दाखल झाले असून, डीजे जप्त करून ''नो म्युझिक, ओन्ली पोलिस ॲक्शन'' हा संदेश शहरभर पोहोचला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपाधीक्षक जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक नितीन देशमुख यांच्या पथकाने केली.

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२–४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–७४८**
**दिनांक –१०/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संतोष गिरीधर मुऱ्हाडे रा. नांदीवाडी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संतोष गिरीधर मुऱ्हाडे | स्वतः | ०२/०५/१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–१०/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

### जाहिर प्रगटन
### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२–४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–३२५**
**दिनांक –२०/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती निवृत्ती लक्ष्मण वाघुंडे रा. ताडहदगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रगती निवृत्ती वाघुंडे | मुलगी | ३०/०६/२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–२०/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/२१८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :– १८/०८/२०२५

नाव बदलण्याचा
### जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुरेखा प्रताप मस्के रा. अंबड सर्व्हे नं. ४५४/१ प्लॉट नं.३ सि.स.न. १८७४/अ/३ नं.प.मि.नं.१८–१०६–३/३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८–१०६–३/३ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व– ओपन स्पेस
पश्चिम : भुखंड क्र. १८–१०६–३/१
दक्षिण– इलेक्ट्रीक लाईनची सोडलेली जागा
उत्तरः ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# ना. भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षणाचा लढा तीव्र करणार -ॲड. राऊत

## ओबीसीच्या जनजागृती निमित्ताने हिवरसिंगा येथे घोंगडी बैठक संपन्न

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या ओबीसीकरणामुळे ओबीसी समाजामध्ये प्रचंड नाराजी असून ही नाराजी राज्यभरातील ओबीसी समाज आंदोलने निदर्शने आणि मोर्चाच्या माध्यमातून दाखवून देत आहे. महाराष्ट्र शासनाने काढलेला हैदराबाद गॅझेटचा जीआर तात्काळ रद्द करण्यात यावा या प्रमुख मागणीसह ओबीसी समाजाच्या इतर मागण्यांसाठी ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसी जनजागृतीचे काम सुरू असून ना. भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षणाचा लढा अधिक तीव्र करणार असल्याचे



प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा येथे आयोजित घोंगडी बैठकी प्रसंगी केले.


शिरूर तालुक्यातील हिवरसिंगा येथे आज ओबीसी जनजागृती निमित्त घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या ठिकाणी प्रमुख मार्गदर्शक म्हणून समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड.सुभाष राऊत यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी चंद्रकांत सानप, माऊली सिरसट, मोहन आघाव, केशव तांदळे, निखील शिंदे, नितीन राऊत, अर्जुन दुधाळ, मयुरी बांगर. विठ्ठल देवकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना ॲड. सुभाष राऊत म्हणाले की, मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जोर धरू लागल्याने आंदोलन व दबावाला बळी पडून महाराष्ट्र सरकार ओबीसी समाजावर अन्याय होईल असे निर्णय घेत आहे. आणि नुकताच एक जीआर काढून अगदी शपथपत्रावरही जातीचे प्रमाणपत्र द्या असे त्यात नमूद केले असल्याने ओबीसी समाज अस्थिर झाला असून त्यांच्यावर अन्याय करण्यात आलेला आहे. मागच्या कित्येक पिढ्यांपासून ओबीसी प्रवर्गामध्ये असणाऱ्या जाती मोलमजुरी करून पोट भरत आलेल्या आहेत. आणखीही म्हणावा तेवढा सामाजिक पटलावर ओबीसी समाज आलेला नाही.

◀◀ पान २ वर

## मांजरा नदी पुलावर मुरूम टाकल्यामुळे धुळीने व्यापाऱ्यांना व वाहन धारकांना त्रास



**पाटोदा प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील मुख्य पुलावरील खड्डे पडल्यामुळे गणपती विसर्जनाच्या वेळेस खड्डे असल्यामुळे मुरूम टाकून तात्पुरती मलमपट्टी केली मात्र त्यामुळे त्रास वाहनधारक व पुलाशेजारील व्यापाऱ्यांना व नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत असून. आधी पुलावरील खड्ड्यामुळे त्रास आता पाऊस उघडल्यामुळे मुरूम टाकल्यामुळे त्या मुरमाचा फुफुटा भरपूर प्रमाणात होत असून वाहनधारकांना गाडी चालवणे अवघड असून व्यापाऱ्यांना सुद्धा श्वसनाचा त्रास होत असून व्यापारी कंटाळ असून ही ही बाब व्यापाऱ्यांनी लक्षात आणून दिल्यामुळे. शहराला कधी चांगला पुढारी मिळेल का नाही असे व्यापारी बोलून दाखवत असून. कधीतरी पाटोदा नगरपंचायतने चांगले काम करून दाखवावे असे व्यापारी खाजगीत बोलून दाखवत आहे आहेत. नगरपंचायत लवकरात लवकर पुलावरील मुरमाचा बंदोबस्त करावा व व्यापाऱ्यांना होणारा त्रास कमी करावा अशी अपेक्षा व्यापारी नगरपंचायत कडून करत आहे.

# मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची २०० पदे पदोन्नतीने तातडीने भरण्याची कार्यवाही करणार- सीईओ रहमान

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाने ऑनलाईन केलेल्या बीड जिल्ह्यातील सुमारे ४५९६ शिक्षकांना येत्या दोन दिवसात कार्यमुक्त करून ज्या त्या ठिकाणी रुजू करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. दरम्यान बीड जिल्हा परिषदेतील मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखाची २०० रित्या पदे तातडीने पदोन्नतीने भरण्यात येणार असल्याची माहिती बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.



या संदर्भात बोलतांना सिईओ जितिन रहमान म्हणाले, बीड जिल्ह्यात ३५० शिक्षक अतिरीक्त झाले आहेत. जिल्ह्यात मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्यामुळे ऑनलाईन बदली प्रक्रिया संपताच तत्काळ जिल्हा परिषदेच्या शिक्षक स्वर्गातील ज्येष्ठ शिक्षक आणि पदवीधर यांच्या मधून मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखाची पदोन्नती करण्यात येणार आहे.जिह्यातील मिशन जिरेवाडी उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, तांड्यावर पुन्हा आता वाढीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित सर्व यंत्रणेला आदेश देण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात घरकुल बांधकामे प्रगती पदावर असून येत्या दिवाळी पर्यंत सुमारे ५० हजार घरे पूर्ण करुन लाभार्थी नव्या घरात दिवाळी साजरी करण्यात येणार आहेत. दर शुक्रवारी प्रत्येक गावात घरकुल योजनेच्या पुर्णत्वास नेण्यासाठी जबाबदारी देण्यात आली आहे. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील ऊसतोड कामगाराच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी राज्यस्तरावर नियुक्ती करण्यात आलेल्या संस्थेच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात असल्याचेही रहमान यावेळी म्हटले.

# जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या नविन जोडणीमुळे पाण्याचा प्रश्न सुटणार- आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या २२० के.व्ही. नाळवंडी या लाईनवरून ३३/११ के.व्ही. म्हाळसजवळा फिडरला जोडून ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला नविन जोडणीच्या कामाचा शुभारंभ संपन्न झाला.

बीड विधानसभेचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला जवळा येथील सबस्टेशन मधून विद्युत प्रवाह वाहीनीच्या नविन जोडणीच्या कामाचा शुभारंभ संपन्न झाला.सदर लाईन जोडल्यामुळे २४ तास लाईट जल शुद्धीकरण केंद्रला उपलब्ध राहणार आहे.



त्यामुळे बीड शहराला अखंडित पाणी पुरवठा होणार असून बीड शहरातील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पावर भेट देऊन दुरुस्तीचे कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. बीड शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून, त्यासाठी माजलगाव धरणातून पाणी आणण्याचा विचार देखील केला जात आहे.

# इंडिया बँकेच्या मॅनेजरची ग्राहकांना अरेरावीची भाषा

## खातेदारांनी केली ऑनलाइन तक्रार, वरिष्ठ अधिकारी यांनी मुजोर मॅनेजरला धडा शिकवावा

**तलवाडा प्रतिनिधी**

गेवराई येथील इंडिया बँकेच्या मॅनेजरकडून ग्राहकांना थेट अरेरावीची भाषा वापरली जात आहे. आरटीजीएस का झाले नाही? याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या भालेराव नामक ग्राहकाला तुम्ही डायरेक्ट माझ्याकडे कसे आलात? तुम्हाला कुठे जायचे ते जा असे म्हणत अरेरावी केल्याचा प्रकार घडला आहे. विशेष म्हणजे बँक मॅनेजरकडून होत असलेल्या अरेरावीची व्हिडीओ देखील समोर आला असून याप्रकारामुळे संताप व्यक्त होवू लागला

आहे. बँकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना ग्राहकांना कसे बोलावे याचेच संस्कार नसतील तर सर्वसामान्यांनी जायचे तरी कुणाकडे? असा प्रश्न भालेराव यांनी उपस्थित केला आहे.

गेवराई तालुक्यातील भोगलगाव येथील रहिवासी असलेले शेतकरी भालेराव हे दिनांक ९ सप्टेंबर रोजी ३ लाखाच्या आरटीजीएस करण्यासाठी बँकेत गेले होते. फॉर्म भरून दिला तरीही आरटीजीएस झाले नाही.

◀◀ पान २ वर

# संपादक राजेंद्र होळकर यांना पत्नीशोक

**बीड। प्रतिनिधी**

अभिमान परिवाराचा आधार असलेल्या संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर (वय ५४) यांचे उपचारा दरम्यान पुणे येथे बुधवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. सुहासिनी होळकर यांच्या निधनाने अभिमान परिवाराचा मोठा आधार कोसळला आहे.



अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर मागच्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचार सुरू होते. तब्बल १ महिन्याहून अधिक काळ त्यांनी आजाराशी कडवी झुंज दिली. मात्र बुधवारी पहाटे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

सुहासिनी होळकर यांनी अत्यंत जिद्दीने आणि संघर्षाने जीवन जगले होते, अभिमान परिवार मोठा करण्यात संपादक राजेंद्र होळकर यांना त्यांनी कायम खंबीरसाथ दिली होती. एक संवेदनशील व्यक्ती, कर्तव्यदक्ष गृहीणी, कर्तव्यकठोर माता अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडत

◀◀ पान २ वर

# बीड पोलीस दलाच्या कामकाजात पेपरलेस प्रणालीची अंमलबजावणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पोलीस दलाने तंत्रज्ञानाच्या युगाशी ताल धरत आपल्या कामकाजात क्रांतिकारी पाऊल टाकले असुन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे. पारंपारिक कागदी कामकाजाला पुर्णविराम देत बोड जिल्हा पोलीस प्रशासनाकडुन ई-ऑफिस प्रणाली लागू करण्यात आली आहे. पुर्वी प्रत्येक पत्रव्यवहारासाठी प्रिंट काढणे, दस्तऐवज तयार करणे, सह्या करुन त्याचे गड्डे वरिष्ठांकडे पोहोचविण्यासाठी प्रत्यक्ष कर्मचारी नेमावा लागत असे. यामुळे वेळ श्रम आणि खर्च यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असे. आता या पारंपारिक पद्धतीला पूर्णविराम देत सर्व काम डिजिटल सही द्वारे होत आहे. या उपक्रमामुळे पोलीस खात्यातील सर्व प्रकारचे कागदपत्रे, प्रस्ताव, पत्रव्यवहार आणि मंजुरी प्रक्रिया आता ऑनलाइन पध्दतीने होणार आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात गती, पारदर्शकता व कार्यक्षमता वाढणार असुन, वेळेची व मनुष्यबळाची बचत होणार आहे.

ई-ऑफिस प्रणालीमुळे अधिकारी व अंमलदार यांना कायदा व सुव्यवस्थेचे कर्तव्य बजावत असताना सुध्दा ऑनलाईन फाईल पाहणे, मंजुरी देणे व पाठविणे शक्य होणार आहे. यामुळे कामकाजातील विलंब टळणार असुन पेपरलेस ऑफिस या संकल्पनेला चालना मिळणार आहे.ई-ऑफिस प्रणालीमुळे बीड पोलीस दलाचे कामकाज अधिक पारदर्शक, कार्यक्षम व वेगवान होण्यास सहाय्य मिळणार आहे.

◀◀ पान २ वर

# खराब रस्त्यामुळे पिंपळा - लोणी मार्गावरील बस बंद करण्याचा निर्णय

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सय्यदमीर लोणी - पिंपळा या मार्गे येणारी अहिल्यानगर ते पिंपळा बस बंद करण्याचा निर्णय राज्य मार्ग परिवहन महामंडळ आगार अहिल्यानगर यांनी घेतला आहे.हा निर्णय या मार्गावरील रस्ता खराब असल्यामुळे बस द्वारे प्रवासी वाहतूक करणे, धोकेदायक झाले असल्याचे मत अहिल्यानगरच्या आगार प्रमुखांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे राज्य

परिवहन महामंडळाच्या बसचे आणि पर्यायाने प्रवाशांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे या बस बंद करण्यात आल्याचे पत्र त्यांनी सरपंच आणि ग्रामसेवक पिंपळा ग्रामपंचायत आणि सय्यदमीर लोणी ग्रामपंचायत यांना दिले आहे.या पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे की, मांडवा ते



लोणी पिंपळा रस्ता पावसामुळे खराब झालेला आहे.या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून या रस्त्यावर प्रवासी वाहतूक करणे

धोकेदायक झाले आहे. त्यामुळे बस घसरून अपघात होण्याची शक्यता आहे. हा प्रस्ताव प्रवासी वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाला आहे. त्यामुळे राज्यपाल परिवहन महामंडळाच्या बसचे स्प्रिंगचे स्प्रिंग व टायरचे नुकसान होऊन अथवा काचा गळून पडत आहेत त्यामुळे मंडळाचे नुकसान आर्थिक नुकसान होत आहे. जोपर्यंत रस्ता व्यवस्थित होत नाही.आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ता प्रवासी वाहतुकीस योग्य असल्याचे प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत बसच्या फेऱ्या बंद करण्यात येत असल्याचे या पत्राद्वारे त्यांनी कळविले आहे. जेव्हा प्रमाणपत्र मिळेल त्यानंतर या मार्गावरील बस सुरु करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भाजपा युवा मोर्चाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी गोपीनाथ गडावर नतमस्तक होत घेतले आशीर्वाद

**वडवणी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे नवनिर्वाचित बीड जिल्हाध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांनी निवड झाल्यानंतर प्रथमच लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळी नतमस्तक होत घेतले आशीर्वाद तर मुंबई येथे रामटेक बंगल्यावर भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा राज्याच्या पशुसंवर्धन,पर्यटन व वातावरण बदल खात्याच्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेत निवडीच्या संदर्भात आभार मानले.भाजपाचे विचारधारा व सरकारी विकासात्मक कामे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कटिबद्ध





## मंत्री पंकजा मुंडे यांचे मानले आभार

आहोत अशी भावना संजयभाऊ आंधळे यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांचे नेते तथा चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार केशवराव आंधळे यांनी लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सुखदुःखामध्ये त्यांच्यासोबत एकनिष्ठ राहिलेले आमदार तथा त्यांच्या पश्चात मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यासोबत खंबीरपणे उभे असलेले आंधळे कुटुंब त्यांनी राजकारण व अर्थकारणासाठी,पदासाठी कधीही मुंडे कुटुंबाची साथ सोडली नाही

याप्रसंगी वडवणी शहराचे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अनिलदादा चोले,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक पांडुरंग बापू अंडील,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत भैय्या धस,भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा सचिव मच्छिंद्र बप्पा झाटे,युवा नेते धनराज मुंडे, माजी सरपंच डॉ.रोहिदास खोटे, पत्रकार अविनाश मुजमुले यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रत्येक व्यक्तीने अन्यायासमोर आपला ताट कणा दाखवला पाहिजे - विलास बडे

**आष्टी/म्हसोबाचीवाडी । प्रतिनिधी**

**प्रत्येक व्यक्तीने अन्यायासमोर आपला कना ताठ ठेवला पाहिजे असे प्रतिपादन पत्रकार आणि वृत्तनिवेदक विलास बडे यांनी पनवेल येथे झालेल्या एका वृत्तपत्राच्या आयोजित पुरस्कार सोहळ्यात केले.**

सोहळ्याचे उद्धाटन उद्योगपती सुधीर कटेकर, न्यूज १८ लोकमतचे सहसंपादक विलास बडे, साम टीव्हीचे मुख्य संपादक निलेश खरे आणि प्रसिद्ध अभिनेत्री माधवी जुवेकर,उद्योगपती सुधीर कटेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाला बाल कलाकार अर्जुनी सस्ते, समीर पाडळकर,सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विलास बडे यांनी सांगितले, की प्रत्येक व्यक्तीने संधी आल्यावर आपला



कणा दाखवायला पाहिजे. जिथे अन्याय होतो त्या ठिकाणी पत्रकारांनी व जनतेने आपली भूमिका स्पष्ट करून, न्याय मिळवण्यासाठी झटले पाहिजे, तसेच ''ज्या ठिकाणी आपली स्पष्ट भूमिका मांडावी अशी वेळ येते, तिथे मौन पाळणे योग्य नाही. पत्रकारिता हे केवळ बातम्या देण्याचे काम नसून, ती एक सामाजिक जबाबदारी आहे. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी आपण सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.''असे शब्द त्यांनी व्यक्त केले. तर त्यांनी या वृत्तपत्राने अल्पावधीत केलेल्या सत्यासमाजहिताच्या कामाचा उल्लेख केला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र संपादक अजय कापरे, सहसंपादक मुकुंद कांबळे, कार्यकारी संपादक जगन्नाथ रासवे, उपसंपादक विलास गायकवाड, प्रदीप पाटील, विजय दुंद्रेकर, एम. डी. भोईर, राजू शिंदे, मच्छिंद्र पाटील, मारुती सत्रे, जगदीश क्षीरसागर, अनुराग आमले, शंतनु भालेराव, आदित्य शेटे, आर्यन शेटे, राहुल माने, कैलास नेमाडे, प्रसाद हनुमंते, कैलास रक्ताटे, कार्यक्रम नियोजक विशाल सावंत आणि नियोजन समिती अध्यक्ष बाळा झोडगे यांसह सर्व कर्मचाऱ्यांच्या परिश्रमामुळे लाभले.होते. या कार्यक्रमाला पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, वाचक आदीची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# पंकजाताईंच्या प्रयत्नामुळे महासांगवीच्या संत मिराबाई संस्थानला अडीच कोटींचा निधी

**पाटोदा/बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे पाटोदा तालुक्यातील महासांगवीच्या श्रीक्षेत्र संत मीराबाई आईसाहेब संस्थानला यात्रास्थळ योजनेतून २ कोटी ४० लाखाचा निधी प्राप्त झाला आहे. संस्थानच्या मठाधिपती ह.भ.प. राधाताई सानप यांनी याबद्दल ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत जिल्ह्यातील श्रीक्षेत्र संत मीराबाई गुरू भगवान संस्थानला यात्रास्थळाच्या ठिकाणी करण्यात येणाऱ्या विकास कामांना ना. पंकजाताई मुंडे यांनी या अगोदरच तीन कोटी रूपये मंजूर केले होते, त्यातील वीस टक्के निधी रूपये साठ लाख त्यांना मिळालेले होते, उर्वरित २ कोटी ४० लाखाचा निधी त्यांना आज ग्रामविकास विभागाने वितरित केला आहे.

या निधीतून संस्थान परिसरात पुरूष व महिलांसाठी भक्त निवासासह वाहनतळ, पोहोच रस्ता, एलईडी पथदिवे, सौर पथदिवे, संरक्षण भिंत तसेच सुशोभिकरणाची कामे होणार आहेत. ना. पंकजाताई संत मिराबाई संस्थानच्या भक्त असून संस्थानंशी त्यांचा ऋणानुबंध आहे, त्यांच्यामुळे हा निधी आम्हाला मिळाला असून त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत अशा शब्दांत ह.भ.प. राधाताई सानप यांनी आभार मानले आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे साखळी बॉम्बस्फोटातील आरोपीला हायकोर्टाकडून जामीन; १२ वर्षानंतर तुरुंगाबाहेर येणार फारुख बागवान

मुंबई । प्रतिनिधी

पुणे साखळी बॉम्बस्फोटांमधील आरोपीला १२ वर्षानंतर जामीन मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे, आता आरोपी फारुख बागवानची लवकरच तुरुंगातून सुटका होईल. यापूर्वी, १९ जानेवारी २०२३ रोजी याच प्रकरणातील दुसरा आरोपी असलम शब्बीर शेख उर्फ बंटी जहागीरदारला मुंबई हायकोर्टाने जामीन मंजूर केला होता. २०१३ मध्ये जहागीरदारला अटक करण्यात आली होती. आता, २०१२ सालच्या साखळी स्फोट प्रकरणातील आरोपी फारुख बागवानला जामीन मंजूर करण्यात आला आहे. आरोपी हा खटल्याविना १२ वर्षे कारागृहात असल्याने न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. बागवान विरोधात या प्रकरणाव्यतिरिक्त इतर कोणताही गुन्हा दाखल नसल्याच कोर्टाने निकालात नमूद केलं आहे.



पुणे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात जामीन मिळालेल्या अन्य आरोपींप्रमाणेच बागवानवर आरोप असून समानतेच्या आधारावर बागवानला देखील जमीन मिळण्याचा अधिकार असल्याच निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. खटला जलदगतीने निकाली निघण्याचा मूलभूत अधिकार प्रत्येक आरोपीला आहे. मात्र, बागवानविरुद्धचा खटला नजीकच्या काळात निकाली निघण्याची शक्यता दुर्मिळ असल्याचे निरीक्षणही मुंबई उच्च न्यायालयाने जामीन अर्जावरील सुनावणीवेळी नोंदवले आहे. त्यामुळे, आरोपी फारुख बागवानला मोठा दिलासा मिळाला आहे.

**काय आहे नेमकं प्रकरण**

पुण्यातील जंगली महाराज रोडवर १ ऑगस्ट २०१२ रोजी पाच साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या स्फोटामध्ये एक जण जखमी झाला होता. डेक्कन परिसरातील सहा ठिकाणी हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. त्यातील पाच बॉम्ब काही मिनिटांच्या अंतराने फुटले होते तर एक बॉम्ब फुटला नाही. दहशतवाद्यांकडून हे बॉम्ब तयार करण्यात त्रुटी रहिल्याने मोठी दुर्घटना टळली होती. मात्र, तेव्हा डेक्कन परिसरात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली. अनेकांना सुरुवातीला या स्फोटांचं गांभीर्य लक्षात आलं नाह. पण, काही मिनिटांतच काही अंतरावर ठेवण्यात आलेले पाच बॉम्ब सलग फुटल्याने मोठा दहशतवादी हल्ला असल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर पुण्यातील संपूर्ण यंत्रणा कामाला लागली. स्फोट न झालेला बॉम्बही निकामी करण्यात आला होता.

**'या' पाच ठिकाणी ठेवण्यात आले होते बॉम्ब**

डेक्कन परिसरातील पाच ठिकाणी हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. त्यातील पहिला बॉम्ब बालगंधर्व रंगमंदिराजवळ ठेवण्यात आला होता. त्यानंतर मॅकडोनाल्ड कॅफे, देना बँक, गरवारे पूल या ठिकाणीदेखील बॉम्ब ठेवण्यात आले होते. मात्र बॉम्ब बनवण्यात त्रुटी राहिल्याने पुण्यात मोठी जीवितहानी टळली होती.



# नगररचना योजनेला शेतकऱ्यांचा ठाम विरोध

चांदखेड । प्रतिनिधी

नेरे, सांगवडे, दारुंब्रे, साळुंब्रे, गोडुंब्रे, धामणे या गावांमध्ये पीएमआरडीएने प्रस्तावित केलेली नगररचना योजना आणि नेरे ते उरसे दरम्यानच्या ६५ मीटर रिंग रोड या दोन्ही योजना अन्यायकारक असल्याचा ठाम पवित्रा घेत शेतकऱ्यांनी पीएमआरडीए कार्यालयाला भेट दिली. महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत शेतकऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

बैठकीला पीएमआरडीए आयुक्त डॉ. योगेश म्हसे, नगररचना संचालक अविनाश पाटील, सहसंचालक श्वेता पाटील उपस्थित होते. शेतकरी बांधवांच्या वतीने बोलताना बाळा भेगडे म्हणाले, सदर दोन्ही प्रकल्पामुळे तब्बल २१०० एकर बागायती क्षेत्र बाधित होणार असून, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल. या योजना कोणत्याही परिस्थितीत होऊ दिल्या जाणार नाहीत. जोपर्यंत प्रकल्प रद्द होत नाहीत, तोपर्यंत आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. तसेच लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शेतकरी प्रतिनिधींची बैठक आयोजित करून या विषयावर ठोस निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही भेगडे यांनी दिली.

# जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या आदितीची गगनभरारी! 'नासा'ला भेट देण्यासाठी निवड

भोर - पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील अतिदुर्गम डोंगरी भागातील कोंढरी गावातील एका साध्या मजुराच्या मुलीने स्वप्नवत यश मिळवले आहे. निगुडघर येथील जिल्हा परिषद शाळेत सातवीत शिकणाऱ्या आदिती पारठे हिची अमेरिकेतील प्रतिष्ठित अंतराळ संशोधन संस्था 'नासा'ला भेट देण्यासाठी निवड झाली आहे. तब्बल १६,१२१ विद्यार्थ्यांमधून तिने ही संधी मिळवत आपला ठसा उमटवला आहे. या यशामुळे कोंढरी गावासह संपूर्ण भोर तालुका आणि पुणे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.



पुणे जिल्हा परिषदेमार्फत राबवण्यात येणाऱ्या विशेष उपक्रमांतर्गत, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील २५ विद्यार्थ्यांना नासाला भेट देण्याची संधी दिली जाते. यंदा या उपक्रमासाठी १६,१२१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहावी आणि सातवीतील विद्यार्थ्यांना लेखी परीक्षा, ऑनलाइन परीक्षा आणि मुलाखत या तीन कठीण टप्प्यांमधून यशस्वी होणे आवश्यक होते.

या सर्व चाचण्या उत्तीर्ण करत आदितीने आपली क्षमता सिद्ध केली. मी खूप मेहनत घेतली. लेखी आणि ऑनलाइन परीक्षेनंतर मुलाखतीसाठी निवड झाल्यावर खूप आनंद झाला. आता नासामध्ये जाऊन अंतराळ संशोधन आणि शास्त्रज्ञांना भेटण्याची उत्सुकता आहे, असे आदितीने उत्साहाने सांगितले.आदितीचे आई-वडील मजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांना आपल्या मुलीच्या यशाचा प्रचंड अभिमान आहे. आमच्या घरातील कुणी विमानतळही पाहिलेलं नाही. पण आमची मुलगी आता सातासमुद्रापार नासाला जाणार आहे. हे स्वप्नवत आहे, असे तिच्या कुटुंबीयांनी भावुक होत सांगितले. आदितीने शिक्षणाच्या जोरावर मोठं व्हावं, ही आमची इच्छा आहे, असेही त्यांनी नमूद केले.कोंढरी गावातील ग्रामस्थांना आदितीच्या या यशाचा मनापासून आनंद आहे. दुर्गम डोंगरी भागातून येऊन अशी संधी मिळवणारी आदिती आमच्यासाठी प्रेरणा आहे, असे गावकऱ्यांनी सांगितले. शिक्षणतज्ज्ञांनीही या यशाचे कौतुक करत जिल्हा परिषदेच्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा संधी उपलब्ध करून देणे ही शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रगतीसाठी महत्त्वाची बाब आहे, असे त्यांनी म्हटले.आदितीच्या या यशाने भोर तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये नव्या स्वप्नांना बळ मिळाले आहे. एका साध्या घरातील मुलीने मिळवलेले हे यश संघर्षातून यशस्वी होण्याचा आदर्श ठरले आहे. आदिती आता नासामध्ये अंतराळ संशोधनाच्या विश्वात पाऊल ठेवण्यास सज्ज आहे, आणि तिची ही गगनभरारी अनेकांना प्रेरणा देणारी ठरेल, यात शंका नाही.

# परीक्षांच्या सर्व कामकाजावर बहिष्कार टाकणार; नेट-सेट, पीएचडी धारक संघर्ष समितीचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

**राज्य शासनाने प्राध्यापक भरतीसह अन्य मागण्याबाबत ठोस निर्णय न घेतल्यामुळे नेट-सेट, पीएचडी धारक संघर्ष समितीच्या वतीने उच्च शिक्षण संचालनालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु करण्यात आले आहे. मागण्या मान्य न झाल्यास तासिका तत्वावरील (सीएचबी) प्राध्यापक परीक्षांच्या सर्व कामकाजावर बहिष्कार टाकणार असल्याचा इशाराही देण्यात आलेला आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ जुलै २०२५ रोजी राज्यातील अशासकीय महाविद्यालयांमध्ये ५ हजार १२ प्राध्यापक भरती तसेच २ हजार ९०० शिक्षकेतर पदांची भरती केली जाईल या संदर्भात घोषणा केली होती. दोन महिने उलटून देखील प्राध्यापक भरतीचा अध्यादेशच न निघाल्याने संघर्ष समितीने तीव्र संताप व्यक्त केला आहे. राज्यातील महाविद्यालयांची दयनीय अवस्था असून अपुऱ्या प्राध्यापकामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.



प्राध्यापक भरती न केल्यामुळे राष्ट्रीय संस्थात्मक फ्रेमवर्क रँकिंग मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रँकिंग घसरले आहे. नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले असून या शैक्षणिक धोरणांमध्ये विषयांची संख्या वाढल्याने प्राध्यापकांच्या कार्यभारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु शिकवण्यासाठी पूर्णवेळ प्राध्यापक नसल्याने विद्यार्थ्यांनी देखील महाविद्यालयांकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. शंभर टक्के प्राध्यापक भरती करण्यात यावी तसेच समान कामाला समान वेतन देण्यात यावे यासाठी संघर्ष समितीच्या माध्यमातून गेली दहा वर्षापासून सातत्याने लढा दिला जात आहे परंतु शासन प्रत्येक वेळेस पद भरती बाबत चालढकल करत आहे.महाविद्यालयांमध्ये सर्रासपणे सीएचबी धोरण आणून उच्च शिक्षितांची सरकारच्या माध्यमातून पिळवणूक केली जात आहे. आतापर्यंत १५ सीएचबी प्राध्यापकांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले आहे. प्राध्यापक भरतीचा जीआर व इतर मागण्या पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीमध्ये आंदोलन थांबवले जाणार नाही, असा इशारा नेट-सेट, पीएचडी धारक संघर्ष समिती राज्य समन्वयक डॉ. प्रमोद तांबे यांनी दिला आहे.

# पुण्यात कोयता गँगचा धुमाकूळ, आम्ही इथले भाई म्हणत दोन भावांवर कोयत्याने हल्ला, दहशत पसरवू नका म्हणताच...

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील औंध परिसरात गेल्या काही दिवसांपासून कोयता गँगने दहशत माजवली आहे. आम्ही इथले भाई आहोत, दुकान बंद करा, अशा शब्दांत धमकावत दोन भावांवर कोयत्याने हल्ला करण्यात आला आहे. यासोबतच मोबाईल शॉपीच्या बाहेरची काच फोडून दहशतीचं वातावरण निर्माण करण्यात आलं. एवढंच नाही तर या दहशतीविरुद्ध आवाज उठवणाऱ्या एका व्यक्तीची सफारी गाडी फोडून त्याला लक्ष्य करण्यात आलं. या तिन्ही घटनांमुळे औंध परिसरात नागरिकांमध्ये भीतीचं सावट पसरलं आहे.

**हल्ल्याच्या सलग घटना**

औंधमधील एका व्यापाऱ्याला आणि त्याच्या भावाला कोयत्याने मारहाण करण्यात आली. दुकान बंद कर नाहीतर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देत हल्लेखोरांनी परिसरात गोंधळ उडवला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी एका मोबाईल शॉपीच्या बाहेरील काच फोडली. याचा सीसीटीव्ही फुटेजही समोर आलं आहे. दुसऱ्या घटनेत, ही दहशत पसरवू नका असं सांगणाऱ्या स्थानिक व्यक्तीची सफारी गाडी हल्लेखोरांनी फोडली. या गाडीचे फोटोही समोर आले असून त्यावरून गुन्ह्याची गंभीरता स्पष्ट होते.

**पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

औंधसारख्या व्यस्त आणि नागरी भागात कोयता गँग इतक्या बेधडकपणे दहशत निर्माण करत असेल, तर पोलिस प्रशासन काय करतंय, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. स्थानिकांनी पोलिसांना तातडीने या प्रकरणात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. हल्लेखोरांचा शोध घेऊन त्यांना अटक करूनच या दहशतीवर नियंत्रण मिळवता येईल, असं नागरिकांचं म्हणणं आहे. औंध परिसरातील सलग घटना केवळ कायदा-सुव्यवस्थेलाच नाही तर नागरिकांच्या सुरक्षिततेलाही मोठं आव्हान निर्माण करत आहेत. दुकाने फोडणे, वाहने उद्ध्वस्त करणे आणि नागरिकांवर कोयत्याने हल्ले करणे या प्रकारांमुळे भीतीचं वातावरण वाढलं आहे. त्यामुळे पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई करून नागरिकांचा विश्वास परत मिळवणं गरजेचं आहे.



## एकतर्फी प्रेमातून शेजारच्या तरुणीवर सपासप वार

शेजारी राहणाऱ्या तरुणीने प्रेमसंबंधास नकार दिल्याच्या रागातून एकतर्फी प्रेम करणाऱ्या २४ वर्षीय शेजाऱ्यानं तिची हत्या केली. २३ वर्षीय तरुणीची भाजी कापण्याच्या सुऱ्याने तिच्या राहत्या घरातच १० महिन्यापूर्वी गळा चिरून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. यामधील खळबळजनक बाब म्हणजे मोठ्या बहिणीला वाचवण्यासाठी गेलेल्या लहान बहिणीलाही सुऱ्याने वार करून गंभीर जखमी केले होते. ही घटना भिवंडी शहरातील भादवड गावातील कानिफनाथ मंदिराजवळील कृष्णानगरमधील शत्रुघ्न तरे चाळीत घडली होती.

# इंदापुरातील मानाचा तिसरा गणपती बाप्पाचं जल्लोषात विसर्जन !

इंदापूर । प्रतिनिधी

श्री.नेहरू सामाजिक मित्र मंडळ ट्रस्ट, इंदापूर शहरातील मेन रोड वरील नेहरू चौक येथे वाहतुकीला कोणतीही अडचण येणार नाही.याची दखल घेऊन,गेली साधारण सत्तर वर्षापासुन गणेशोत्सव साजरा करीत आहेत. हा इंदापूर शहरातील मानाचा तिसरा गणपतीचे विसर्जन जल्लोषात करण्यांत आले.

यंदाच्या वर्षी उत्सवाच्याया १० व्या दिवशी मंडळाने इंदापूर शहरातील महिला-भगिनींच्या हस्ते गणेशाची महाआरती घेण्यात आली. यामध्ये शेकडो महिलांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला होता. तसेच या महाआरती च्या कार्यक्रमांमध्ये एक अनोखा असा आरतीचे पुजा ताट सजावट स्पर्धेचा कार्यक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला.

विसर्जन दिवशी मुख्याधिकारी रमेश ढगे,पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत वाघमारे, माजी नगराध्यक्षा अंकिता शहा, शहा ग्लोबल स्कुलचे विश्वस्त मुकुंद शहा, माजी नगरसेवक भरत शहा यांच्या हस्ते आरती करून, विसर्जनसाठी हा गणपती दुपारी १२.३० वा.भक्तीमय वातावरणात मार्गस्थ झाला.



या वर्षीच्या विसर्जन मिरवणुकीतील १४ फुटी श्री.विठ्ठलाची आकर्षक अशी मुर्ती सर्वांचे लक्ष वेधले. सायंकाळी साडेसहा वाजता इंदापूर नगरपालिकेच्या वतीने १०० फुटी रोड शेजारी उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावामध्ये गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.या मंडळाचा गौरव नगरपरिषदेने केला आहे.

# अपघातील ब्लॅकस्पॉट काढण्यावर भर द्या; सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षकांच्या सूचना

पुणे - जिल्ह्यात अपघातांमध्ये वार्षिक ९०० पेक्षा अधिक मृत्यू होत असल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्व संबंधित विभागाने प्रयत्न करावेत. अपघातग्रस्त भागांचा (ब्लॅकस्पॉट) सविस्तर अभ्यास करून योग्य उपाययोजना राबविण्यावर भर द्यावा, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई, अनुराधा भंडारे, पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पिंपरी-चिंचवडचे संदेश चव्हाण, बारामतीचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.बाविस्कर यांनी सांगितले की, अपघाती भागांचा सर्वेक्षण करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी २३ जून २०२५च्या बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार प्रादेशिक परिवहन विभागाने ब्लॅकस्पॉटचे सर्वेक्षण करुन उपाययोजना सुचविल्या असून त्यानुसार संबंधित विभागांनी कार्यवाही करावी. हिंजेवाडी आणि चाकण परिसरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस व परिवहन विभागाने विशेष उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी नमूद केले.

वाहनधारकांना वाहन खरेदीवेळी हेल्मेट उपलब्ध करून देण्यासाठी वाहन विक्रेत्यांसोबत बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात, असेही निर्देश बाविस्कर यांनी दिले. रस्ते सुरक्षा सुधारणा आणि अपघातांची नोंद करण्यासाठी केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने तयार केलेल्या एकात्मिक रस्ते अपघात डेटाबेस (आयआरएडी) मध्ये वस्तुनिष्ठ माहिती भरावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यात येत्या जानेवारी २०२६ मध्ये होणाऱ्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर रस्ते सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

# नांदुरमध्ये बिबट्याची दहशत! ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

पुणे । प्रतिनिधी

**नांदूर ता दौंड रात्री दि ९ सप्टेंबर वार मंगळवार बिबट्याने शेळ्या मेंढ्यांवर हल्ला केल्याचा घटना घडली होती. यामुळे दौंड तालुक्यातील नांदुर ( बोराटे वस्ती ) येथील ग्रामस्थ भीतीच्या छायेत आहेत. शेळ्या मेंढ्या बिबट्टयाने फस्त केल्या आहेत. या घटनेमुळे ग्रामस्थ घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत. या सर्व घटनांची गंभीर दखल घेऊन शासनाने त्वरित कारवाई करावी अशी मागणी नांदुर ग्रामपंचाय यांनी वनविभागाकडे केली आहे.**

**शेतकऱ्यांचा सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर**

गेले अनेक महिन्यापासुन नांदुर शिवारात बिबट्या दिसल्याची चर्चा परिसरातील गावांमध्ये सुरू आहे. शेतामध्ये जाण्याचे टाळत आहेत. परिसरात वन्य प्राण्याचा चांगलाच वावर असल्याचे स्पष्ट होत आहे. अन्नाच्या शोधात हा बिबट्या नागरी वस्तीकडे आला असल्याचे अनेकांचे मत आहे. दरम्यान, बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरातील आदी गावच्या नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. बिबट्याची दहशत निर्माण झाल्याने शेतकरी शेतामध्ये. जाण्यातील टाळाटाळ करत आहे



शेतकऱ्यांची सुरक्षा हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. शेतामध्ये रानडूकर, हैदोस वाढला आहे. शेतामध्ये नाही गेले तर वन्यप्राणी पिके फस्त करतात. यामुळे वन विभागाने वन्यप्राण्यांचा बंदोस्त करून भयमुक्त करावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.वनविभागाची तसेच रेस्क्यू या संस्थेची रेस्क्यू टीम रवाना करून बिबट्टया पकडण्यात यावा अशी मागणी नांदुर गावातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

संबंधित पुणे जिल्हाअधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, वनअधिकारी आदी सर्व प्रशासनिय यांनी लवकरात लवकर पाहाणी करून योगय निर्णय घेवा नांदुर गावातील शेतकरी किंवा शेतमजूर महिला व इतर कोणाचा बळी गेल्यास सर्व प्रशासकिय अधिकारी जबाबदार असतील असा ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.